बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक:बाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | सोमवार दि.२३ जून २०२५ | वर्षे४थे | अंक२९८वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

## ३१ मार्च २०२५ पर्यंतचे राजकीय खटले मागे

**मुंबई :** राजकीय आणि सामाजिक आंदोलनातील ज्या गुन्ह्यांमध्ये ३१ मार्च २०२५ पर्यंत दोषारोपपत्र दाखल होतील, असे खटले मागे घेण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. गृह विभागाने शुक्रवारी याबाबतचा शासन निर्णय जारी केला. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय झाल्याने निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांना दिलासा मिळाला आहे.

सार्वजनिक हिताच्या आणि इतर समस्यांकडे राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी राजकीय तसेच सामाजिक संघटनेतील कार्यकर्त्यांकडून सरकार विरोधात आंदोलने केली जातात. निवडणुकीनंतर नव्याने सत्तेवर आलेले सरकार अशा खटल्यांचा आढावा घेऊन राजकीय आणि सामाजिक आंदोलनात दाखल झालेले खटले मागे घेतात. यापूर्वी ज्या गुन्ह्यांमध्ये ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत दोषारोपपत्र दाखल झाले होते, असे खटले मागे घेण्याचा धोरणात्मक निर्णय सरकारने घेतला होता. ही मुदत संपल्याने सरकारने आता ३१ मार्च २०२५ पर्यंतचे दोषारोपपत्र दाखल झालेले गुन्हे मागे घेण्यास मान्यता दिली आहे.

# सर्व आण्विक तळ उद्ध्वस्त करू

## इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांचा इराणला इशारा

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**

इस्रायल-इराण यांच्यात सलग आठव्या दिवशी संघर्ष कायम आहे. दोन्ही देशांनी परस्परांवर शुक्रवारी क्षेपणास्त्रे आणि ड्रोनने हल्ले केले. इस्रायलने इराणमधील महत्त्वांच्या ठिकाणांवर बॉम्बहल्ले केले. इराणने प्रत्युत्तरादाखल इस्रायलवर क्षेपणास्त्रे डागली. यात इस्रायलमधील रुग्णालयाचे नुकसान झाले. दरम्यान, इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी स्पष्ट केले आहे की, इस्रायल इराण विरुद्ध लष्करी कारवाई सुरू ठेवण्यासाठी अमेरिकेच्या परवानगीची वाट पाहणार नाही. इराणमधील अण्विक ठिकाणांवर हल्ला करण्यास इस्रायलची लष्करी यंत्रणा पूर्णपणे सज्ज आहे.

आम्ही निश्चित केलेले उद्दिष्ट साध्य करू. त्यांच्या सर्व आण्विक ठिकाणांवर हल्ला करू. आमच्याकडे अशी कारवाई करण्याची क्षमता आहे, असा इशारा नेतान्याहू यांनी कान पब्लिक ब्रॉडकास्टरला हिब्रू भाषेतून दिलेल्या मुलाखतीदरम्यान दिला. इस्रायल - इराण संघर्षात अमेरिकादेखील सहभागी होण्याची शक्यता आहे. यामुळे मध्य पूर्वेत युद्धाची व्याप्ती वाढणार असल्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.



### इराणमधील आण्विक तळ लक्ष्य!

इस्रायलने इराणमध्ये हल्ला केल्याच्या पहिल्या दिवसापासून इराणमधील आण्विक तळ लक्ष्य केल्याचा दावा केला आहे. मात्र, आण्विक प्रकल्पांसोबतच इस्रायलने इराणची राजधानी तेहरानवर हवाई हल्ले चढवले आहेत. याशिवाय अरक व खांदाब या ठिकाणी असणाऱ्या इराणच्या आण्विक प्रकल्पांचेही मोठे नुकसान केल्याचा दावा इस्रायलने केला आहे. दुसरीकडे इराणने केलेल्या हल्ल्यात मोठ्या प्रमाणावर नागरी वस्तीचे नुकसान झाल्याचा आरोप इस्रायलने केला आहे.

### इस्रायलच्या हल्ल्यात आणखी एका अणू शास्त्रज्ञाचा मृत्यू

- गेल्या काही दिवसांपासून इस्रायल आणि इराणमधील संघर्ष वाढतच चालला असून दोन्ही देशांकडून एकमेकांकडून बॉम्ब आणि मिसाईल हल्ले सुरूच आहेत. दरम्यान, आता इराणची राजधानी असलेल्या तेहराणमध्ये गिला जवळ इस्त्रायलने हल्ला केला आहे. या हल्ल्यात एका अणू शास्त्रज्ञाचा मृत्यू झाला आहे.
- इस्त्रायली अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, या स्फोटाचा उद्देश इराणच्या अणू कार्यक्रमाशी संबंधित एका वरिष्ठ शास्त्रज्ञाला लक्ष्य करणे हा होता. प्राथमिक माहितीनुसार, तो शास्त्रज्ञ या हल्ल्यात ठार झाला आहे. मात्र, इराण सरकारकडून याबाबत कोणतेही अधिकृत वक्तव्य अद्याप आलेले नाही. या घटनेमुळे दोन्ही देशांमधील आधीपासूनच तणावपूर्ण असलेली परिस्थिती आणखी गंभीर झाली आहे.
- इराणचे अध्यक्ष मसूद पेजेश्कियन यांनी इस्रायली हल्ल्यांबाबत तीव्र इशारा दिला आहे. त्यांनी म्हटले की, शांततेचा एकमेव मार्ग म्हणजे इस्रायलने तत्काळ आणि कोणतीही अट न घालता आपले हल्ले थांबवावेत. पेजेश्कियन यांनी स्पष्ट केले की, जर इस्त्रायलकडून हल्ले सुरूच राहिले, तर इराणला आणखी कठोर प्रत्युत्तर द्यावे लागेल. त्याचबरोबर, इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, इस्रायली हल्ले सुरु असताना अमेरिका किंवा कोणत्याही इतर देशांसोबत यासंबंधी कोणतीही चर्चा होणार नाही.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी, इराण विरुद्धच्या कारवाईत इस्रायलसोबत सहभागी व्हायचे की नाही याचा निर्णय पुढील दोन आठवड्यांच्या आत घेऊ, असे स्पष्ट केले आहे. इस्रायलने अमेरिकेच्या निर्णयाकडे लक्ष न देता इराणवरील हल्ले तीव्र केले आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प आमच्यासोबत सहभागी होऊ इच्छितात की नाही, हा त्यांचा निर्णय आहे, असे नेतान्याहू यांनी म्हटले आहे.

# 'झिरो डेथ पॉलिसी'करिता रेल्वेच्या उपाययोजना पुरेशा नाहीत

**मुंबई (प्रतिनिधी) :**

उपनगरीय रेल्वेकरिता प्रशासनाची 'झिरो डेथ पॉलिसी' असली तरी त्याकरिता रेल्वे प्रशासन करीत असलेल्या उपाययोजना पुरेशा नाहीत, या शब्दांत मुंबई उच्च न्यायालयाने शुक्रवारी आपली नाराजी व्यक्त केली. मुंब्रा स्टेशनजवळ ९ जून रोजी घडलेली घटना पुन्हा होऊ नये, याकरिता ठोस उपाययोजना करण्याचे निर्देश उच्च न्यायालयाने जारी केले आहेत. तसेच साल २०२४ मध्ये दर दिवसाला १० या प्रमाणात ३ हजार ५८८ मृत्यू झाल्याबद्दलही उच्च न्यायालयाने गंभीर चिंता व्यक्त केली.

मुंब्रा स्थानकाजवळ घडलेल्या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये, याकरिता रेल्वे प्रशासनाने एक उच्च स्तरीय समिती स्थापन करण्याचे निर्देश रेल्वे प्रशासनाला दिले आहेत. या समितीने सुचवलेल्या उपाययोजना व त्यावर रेल्वे प्रशासनाने केलेली कारवाई, यावर १४ जुलैच्या पुढील सुनावणीत सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश उच्च न्यायालयाने दिले आहेत.

मुंबई लोकलमधील गर्दीमुळे वाढत्या मृत्यूंची उच्च न्यायालयाने शुक्रवारी गंभीर दखल घेतली. मुंबई उपनगरीय रेल्वेमुळे झालेला मृत्यूदर हा २००९ मध्ये ३८.०८ टक्के इतका होता. तो २०२५ मध्ये कमी झालेला असला तरी साल २०२५ मध्ये मुंबई उपनगरीय रेल्वेवर ३ हजार ५८८ मृत्यूंची नोंद झाली. हे प्रमाण दरदिवसाला १० मृत्यू इतके असल्याने ते गंभीर आहे, अशी चिंता मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे व न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठाने व्यक्त केली.

### उच्च न्यायालयाकडून तीव्र नाराजी व्यक्त




### न्यायालयाने रेल्वे प्रशासनाला सुनावले खडे बोल

मुंबई उपनगरीय रेल्वेतील प्रवाशांच्या मृत्यूसंदर्भात पालघरस्थित यतीन जाधव यांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर शुक्रवारी मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. टोकियोनंतर जागतिक स्तरावर दुसरी सर्वात व्यस्त रेल्वे यंत्रणा म्हणून मुंबई उपनगरीय रेल्वेची ओळख आहे. मोठ्या संख्येने प्रवासी असल्याची सबब पुढे करून रेल्वे प्रशासन आपली जबाबदारी झटकू शकत नाही. ज्या पद्धतीने मुंबईकर प्रवास करतात ते लज्जास्पद असल्याची टीका करत न्यायालयाने रेल्वे प्रशासनाला खडे बोल सुनावले. न्यायालयाने दिलेल्या आदेशांचे पालन केल्याचे सांगता तर मृत्यूचे प्रमाण का कमी झालेले नाही? अशी विचारणा उच्च न्यायालयाने रेल्वे प्रशासनाकडे केली. तसेच निदान आता तरी मानसिकता बदलत पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करून नवीन तंत्रज्ञान वापरून मृत्यू रोखण्यासाठी तज्ज्ञांची उच्चस्तरीय समिती स्थापन करीत त्यासंदर्भात सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश उच्च न्यायालयाने जारी केले आहेत.

## वेचक

### महिला नक्षलवादी ठार

**नवी दिल्ली :** रायपूर : छत्तीसगड राज्यातील कांकेर जिल्ह्यात पोलीस व नक्षलवाद्यांमध्ये शुक्रवार सकाळपासून सायंकाळपर्यंत जोरदार चकमक सुरू होती. जिल्ह्यातील छोटेबेटिया पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही धुमश्चक्री सुरू असून, यामध्ये आतापर्यंत एका महिला नक्षलवाद्याला ठार करण्यात पोलिसांना यश आले आहे. कांकेर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक आय. के. एलिसेला यांनी दिलेल्या माहितीनुसार, नक्षलवाद्यांसोबतची चकमक अजूनही सुरू आहे. मात्र, घटनास्थळी असलेल्या पोलीस पथकाशी सध्या संपर्क होऊ शकलेला नाही.

### अफगाणिस्तानमध्ये भूकंप

**काबूल :** अफगाणिस्तानच्या पश्चिम भागात शुक्रवारी पहाटे भूकंपाचा धक्का बसला. नॅशनल सेंटर फॉर सिस्मोलॉजीनुसार, या भूकंपाची तीव्रता ४.६ रिश्टर स्केल होती. भारतीय वेळेनुसार सकाळी ६ वाजून ११ मिनिटांनी हा भूकंप झाला. भूकंपाचा केंद्रबिंदू ३४.८९ उत्तर अक्षांश आणि ६२.५४ पूर्व रेखांश येथे जमिनीखाली ५० किलोमीटर खोलीवर होता. या भूकंपामुळे परिसरातील कोणतीही जीवितहानी किंवा मालमत्तेचे नुकसान झाल्याची माहिती अद्यापपर्यंत मिळालेली नाही. यापूर्वी, १९ एप्रिल रोजी अफगाणिस्तान-ताजिकिस्तान सीमावर्ती भागात ५.८ रिश्टर स्केलचा भूकंप झाला होता. या भूकंपाचे धक्के उत्तर भारतातील काही भागांत, काश्मीर व दिल्ली-एनसीआरपर्यंत जाणवले होते.



**सोन्याचा भाव**
२४ कॅरेट प्रति तोळा १,००,४८० रुपये
२२ कॅरेट प्रति तोळा ९२,१०० रुपये



**चांदीचा भाव**
प्रति किलो १,१०,००० रुपये




शुक्रवारी इक्विटी बेंचमार्क निर्देशांकात जबरदस्त वाढ झाली आहे. सेन्सेक्स सत्र समाप्तीनंतर १०४६.३० अंकाने वाढत ८२४०८.१७ पातळीवर पोहोचला आहे, तर निफ्टी ५० निर्देशांक ३१९.१५ अंकांने उसळत २५११२.४० पातळीवर पोहोचले आहे. शुक्रवारी दोन्ही निर्देशांकात तब्बल १.२९% वाढ झाल्यानंतर शेअर बाजाराला तेजीमुळे चार चांद लागले आहेत.



# राज्यातील बंदर विभागाचे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे

## केंद्रीय बंदरे मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी केल्या सूचना

**मुंबई (प्रतिनिधी) :**

महाराष्ट्रातील बंदर विभागाचे प्रकल्प गतीने पूर्ण करण्यासाठी केंद्रीय आणि राज्य शासनाचे विभाग यांनी समन्वयाने काम करावे अशा सूचना केंद्रीय बंदरे मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी दिल्या. किनारपट्टीच्या विकासासाठी केंद्रीय आणि राज्य विभागाची एकत्रित बैठक ही एक सकारात्मक पाऊल असल्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे म्हणाले.

राज्यातील बंदर विकास आणि महत्त्वाच्या प्रकल्पांविषयी केंद्रीय मंत्री सोनोवाल यांच्या अध्यक्षतेखाली व मंत्री राणे यांच्या उपस्थितीत केंद्रीय व राज्य शासनाचे विभाग यांची एकत्र बैठक झाली. यावेळी केंद्रीय मंत्री सोनोवाल आणि राज्याचे मंत्री राणे बोलत होते. बैठकीस बंदरे व परिवहन सचिव संजय सेठी, महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. प्रदीप, जेएनपीटीचे अध्यक्ष उन्मेष वाघ, एमबीपीटीचे उपाध्यक्ष आदेश तितारमारे, डीजीसीएचे महासंचालक श्याम जगन्नाथ यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री सोनोवाल म्हणाले की, सागरी व्यापार आणि उद्योग क्षेत्रात भरपूर संधी आहेत. महाराष्ट्रातील बंदरे क्षेत्रातील प्रकल्प महत्त्वाचे असून त्यासाठी लागणाऱ्या परवानगी लवकर देण्यात याव्यात. रेल्वे आणि रस्ते मार्गाने बंदराची जोडणी करणारे प्रकल्प तातडीने मार्गी लावावेत. सागरमाला अंतर्गत महाराष्ट्रात मंजूर करण्यात आलेले प्रकल्प २०२६ सालापर्यंत पूर्ण करावेत.

मंत्री राणे म्हणाले की, केंद्रीय विभागांची परवानगी वेळेत मिळण्यासाठी दोन्ही विभागांनी समन्वयाने काम करावे. या परवानग्या मिळणे सुलभ व्हावे यासाठी प्रयत्न व्हावे. त्यामुळे प्रकल्प वेळेत पूर्ण होऊन खर्चात बचत होईल. आजची बैठक ही सकारात्मक झाली असून यामुळे राज्यातील बंदर विभागाची कामे गतीने मार्गी लागतील अशी आशाही त्यांनी व्यक्त केली. या बैठकीमध्ये वैभववाडी कोल्हापूर रेल्वे प्रकल्प, आनंदवाडी बंदर, रो रो सेवा, वॉटर टॅक्सी, अंतर्गत जलमार्ग, जेटीचे प्रश्न याबाबत चर्चा झाली.

# मुंबई जिल्हा बँकेच्या संचालकपदी तेजस्वी घोसाळकरांची नियुक्ती



**मुंबई (प्रतिनिधी) :** शिवसेना ठाकरे गटाच्या माजी नगरसेविका तेजस्वी घोसाळकर यांची मुंबै जिल्हा बँकेच्या संचालक पदावर नियुक्ती करण्यात आल्याने आणखी एक माजी नगरसेवक ठाकरे गटापासून दूर जाणार का? अशी चर्चा रंगली आहे. मुंबई जिल्हा बँकेचे अध्यक्ष व भाजपा नेते प्रवीण दरेकर यांनी हा अभिषेक घोसाळकर यांच्या दुर्दैवी हत्येनंतर सद्‌भावनेने हा निर्णय घेतल्याचे म्हटले आहे. अभिषेक घोसाळकर मुंबई बँकेत संचालक होते. त्यामुळे अभिषेक घोसाळकर यांच्या मृत्यूनंतर संचालक पदाची जागा रिक्त होती, त्या जागेवर अभिषेकची पत्नी तेजस्वी घोसाळकर यांना संचालकपद दिले गेले आहे. तेजस्वी घोसाळकर पक्षात नाराज असून त्या भाजपामध्ये जाणार असल्याची चर्चा असतानाच भाजपाची सत्ता असलेल्या मुंबई जिल्हा बँकेकडून तेजस्वी घोसाळकरांना संचालक केले गेले आहे.

# निवडणुकीचे व्हीडिओसह फोटो ४५ दिवसांत नष्ट करा

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**

केंद्रीय निवडणूक आयोगाने मतदान प्रक्रियेशी संबंधित व्हीडिओ फुटेज आणि फोटो जतन करण्याच्या कालावधीत बदल केला आहे. या निर्णयानुसार निवडणुकीनंतर आता एक वर्षाऐवजी केवळ ४५ दिवसांपर्यंत हे फुटेज आणि फोटो संग्रहित ठेवले जातील. मतदानाचा निकाल जाहीर झाल्यानंतर हा कालावधी लागू होईल व या कालावधीत कोणतीही निवडणुकीशी संबंधित याचिका दाखल केली नाही, तर डेटा नष्ट केला जाऊ शकतो. अलीकडच्या काळात या सामग्रीचा होणारा दुरुपयोगाचे कारण देत आयोगाने हा बदल केला आहे.



### केंद्रीय निवडणूक आयोगाचे राज्यांना निर्देश

निवडणूक आयोगाने ३० मे रोजी सर्व राज्यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना (सीईओ) या निर्णयासंदर्भात सूचना दिली. नवीन मार्गदर्शक तत्त्वांनुसार, नामांकनपूर्व कालावधी, उमेदवारी अर्ज दाखल करणे, प्रचाराचा कालावधी, मतदान (मतदान केंद्रांच्या आत आणि बाहेर) आणि मतमोजणी यांसारख्या मतदान प्रक्रियेच्या विविध टप्प्यांशी संबंधित फुटेज आता फक्त ४५ दिवसांसाठी जतन केले जातील. निवडणूक याचिका दाखल करण्याच्या कालमर्यादेनुरूप हा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. या कालावधीत एखादी याचिका दाखल करण्यात आलीच, तर प्रकरण निकाली निघेपर्यंत संबंधित फुटेज जतन केले जाईल.

निवडणूक प्रक्रियेचे व्हीडिओ शूटिंग आणि छायाचित्रण कायद्याने अनिवार्य नसून ते केवळ अंतर्गत व्यवस्थापनाचे एक साधन आहे. तथापि, अलीकडच्या काळात, उमेदवार नसलेल्यांनी या सामग्रीचा गैरवापर केल्याच्या घटना घडल्या आहेत. सोशल मीडियावर कोणताही संदर्भ न देता, चुकीच्या पद्धतीने हे फुटेज प्रसारित करण्यात आल्याचे समोर आले आहे. याद्वारे चुकीची माहिती आणि खोटे नॅरेटिव्ह पसरवण्यात आले. यातून कोणतीही कायदेशीर परिणाम हाती येत नाहीत, त्यामुळे याचे पुनरावलोकन करणे आवश्यक होते, असे सर्व राज्यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना (सीईओ) पाठवलेल्या निर्देशपत्रांमध्ये नमूद करण्यात आले आहे.

याआधी ६ सप्टेंबर २०२४ रोजी जारी केलेल्या जुन्या मार्गदर्शक तत्त्वांपेक्षा हे नवीन निर्देश वेगळे आहेत. त्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, वेगवेगळ्या टप्प्यांचे रेकॉर्डिंग ३ महिने ते १ वर्षासाठी जतन करण्याची सूचना करण्यात आली होती. नामांकनापूर्वीचे रेकॉर्डिंग ३ महिने आणि मतदान तसेच मतमोजणीशी संबंधित रेकॉर्डिंग ६ महिने ते १ वर्षासाठी जतन करण्याचे निर्देश होते. आता निवडणूक याचिका दाखल करण्यासाठी असलेल्या ४५ दिवसांच्या कमाल कायदेशीर वेळेनुरूप हे नवे निर्देश जारी केले आहेत. या कालावधीत याचिका दाखल केली गेली, तर प्रकरण न्यायप्रविष्ट असेपर्यंत रेकॉर्डिंग जतन केले जाईल.

# पुण्यनगरीत अवतरला भक्तीचा महासागर

## माऊली व तुकोबांच्या पालखीचे भक्तिभावात स्वागत

**पुणे (प्रतिनिधी) :**

*आषाढीची वारी आहे माझे घरी।*
*आणिक न करी । तीर्थव्रत ।।*

पावलागणिक होणारा विठुनामाचा गजर, टाळ-मृदंगाचा नाद, ज्ञानोबा-तुकोबा नामाचा जयघोष अन् या नादासवे पुढे सरकणारा वैष्णवांचा महाप्रवाह, अशा भारलेल्या वातावरणात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली व जगद्‌गुरू तुकाराम महाराज यांच्या पालख्यांनी शुक्रवारी पुण्यनगरीत प्रवेश केला. पुणेकरांनी अत्यंत भक्तिभावात दोन्ही पालख्यांचे स्वागत केले.



तुकोबांची पालखी आकुर्डीहून, तर माऊलींची पालखी आळंदीहून सकाळी मार्गस्थ झाली. सकाळच्या न्याहारीमुळे बळ प्राप्त झालेले वारकरी टाळ-मृदंगाच्या गजर, अभंगाचा ताल व पावसाच्या साथसंगतीत झपझप पावले टाकू लागले. पावलागणिक वारकऱ्यांचा उत्साह वाढू लागला. तुकोबांच्या पालखीने दुपारी दापोडीत विसावा घेतला. त्यानंतर पालखी पुन्हा पंढरीच्या मार्गावर आली. तोवर वाकडेवाडीतील मरिआई गेट चौक ते पाटील इस्टेटपर्यंतचा सारा परिसर भाविकांच्या गर्दीने फुलून गेला होता. तुकोबा-माऊलींच्या दर्शनाकडे सगळ्यांचेच डोळे लागले होते.

पाटील इस्टेट चौकात तुकोबांच्या पालखी सोहळ्यातील नगारा झडला अन् भाविकांचे डोळे एकवटले. अश्वांचे आगमन होतात भाविकांनी त्यांचे मनोभावे दर्शन घेतले. त्यानंतर बरोबर विविधरंगी फुलांनी सजविलेला तुकोबांचा रथ दृष्टीस पडला. तुकोबांची पालखी येताच दर्शनासाठी भाविकांची झुंबड उडाली. सायंकाळी ५ च्या सुमारास पालखीचे आगमन झाले. महापालिकेच्या वतीने पालखीचे स्वागत करण्यात आले. रथातील तुकोबांची पालखी अन् पादुकांवर माथा टेकवत अनेकांनी धन्यत्वाचा अनुभव घेतला, तर काहींनी डोळे भरून पादुकांचे दर्शन घेतले.

तुकोबांच्या पालखीच्या आगमनानंतर भाविकांच्या नजरा संगमवाडी पुलावर स्थिरावल्या.

## मनीष सिसोदिया आणि सत्येंद्रनाथ जैन यांना पाठवले नव्याने समन्स

# ईडीला दिल्लीत आढळला २००० कोटींचा नवा 'क्लासरूम घोटाळा'

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**

दिल्लीतील कथित दारूवरील अबकारी कर घोटाळ्यामुळे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया आणि कॅबनेट मंत्री सत्येंद्रनाथ जैन यांना ईडीने तुरुंगात धाडले होते. पण आता पुन्हा एकदा मनीष सिसोदिया आणि सत्येंद्रनाथ जैन यांना ईडीने समन्स पाठवले आहे. यावेळी ईडीला २००० कोटींचा नवा घोटाळा आढळला असून हा 'क्लासरूम घोटाळा' असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

शुक्रवारी एसीबीने मनीष सिसोदिया यांची तीन तासांहून अधिक वेळ चौकशी केली. सिसोदिया सकाळी ११ वाजता एजन्सीसमोर हजर झाले आणि दुपारी २.३० च्या सुमारास निघून गेले. या २००० कोटी रुपयांच्या या 'दिल्ली क्लासरूम बांधकाम घोटाळा' प्रकरणी १८ जून रोजी ईडीने दिल्लीतील ३७ ठिकाणी शोधमोहीम राबवली. मनी लॉंडरिंग प्रतिबंधक कायदा २००२च्या तरतुदींनुसार ही शोधमोहीम राबविण्यात आली. दिल्ली सरकारच्या भ्रष्टाचार विरोधी शाखेने या प्रकरणी मनीष सिसोदिया, सत्येंद्र जैन आणि इतरांविरुद्ध दाखल केलेल्या एफआयआरच्या आधारे ही चौकशी सुरू करण्यात आली आहे.

### बनावट बँक खाती उघडल्याचा आरोप



दरम्यान, कामगारांच्या नावाने ३२२ बनावट बँक खाती तयार करण्यात आली असून यामध्ये सार्वजनिक निधी वळवण्यात आल्याचा आरोपही ईडीने केला आहे. याशिवाय विविध खासगी कंत्राटदार आणि बनावट संस्थांचे बनावट लेटरहेडही याठिकाणी सापडले आणि जप्त करण्यात आले आहे. या लेटरहेडचा वापर बनावट खरेदी रेकॉर्ड आणि बनावट खरेदी बिले तयार करण्यासाठी केला जात होता. त्याचबरोबर जीएनसीटीडी विभागांना सादर केलेल्या बनावट पावत्यांशी संबंधित पुरावे देखील सापडले असून ते ईडीकडून जप्त करण्यात आले आहेत. तपासणी दरम्यान अनेक बनावट कंपन्या आढळून आल्या आहेत.

### २,४०५ वर्गखोल्यांची आवश्यकता असताना १२,७४८ बांधल्या खोल्या

ईडीच्या मते, २,४०५ वर्गखोल्यांची आवश्यकता असताना, योग्य मंजुरीशिवाय प्रकल्पाची व्याप्ती मनमानीपणे वाढवून आधी या खोल्या ७,१८० आणि नंतर १२,७४८ खोल्यांपर्यंत वाढविण्यात आली. यामुळे प्राधान्यक्रम १ आणि प्राधान्यक्रम २ या टप्प्यांमधील खर्चात ४९.०३ टक्क्यांपर्यंत लक्षणीय वाढ झाली आहे. या प्रकरणी केलेल्या छापेमारीत ईडीने खासगी कंत्राटदारांकडून या घोटाळ्याचे पुरावे व अन्य साहित्य जप्त केले आहेत.

# लॅंडिंग करण्यापूर्वीच एअर इंडियाच्या विमानाला पक्ष्याची धडक

**पुणे (प्रतिनिधी) :**

दिल्लीवरून पुण्याला आलेल्या एका एअर इंडियाच्या विमानाला पक्ष्याची धडक बसली. विमान धावपट्टीवरून उतरल्यानंतर ही बाब समोर आली. सकाळी ७.१४ वाजता पुणे विमानतळाच्या धावपट्टीवर हे विमान सुरक्षितपणे उतरले. त्यानंतर त्याचे परतीचे उड्डाण रद्द करण्यात आले. एअर इंडियाचे विमान दिल्लीवरून पहाटे ५.३१ वाजता निघाले होते.

विमान पुणे विमानतळावर उतरल्यानंतर कंपनीच्या अधिकाऱ्यांनी पक्षी धडकल्याची माहिती दिली. एअर बस कंपनीचे ३२० या श्रेणीतील हे विमान आहे. हेच विमान पुण्यावरून पुन्हा दिल्लीला जाणार होते. प्रवाशांच्या सुरक्षेच्या कारणास्तव विमानाचे परतीचे उड्डाण रद्द करण्यात आले. एअर इंडियाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, एआय-२४६९ दिल्ली-पुणे हे विमान २० जून रोजी पुण्यावरून दिल्लीला जाणार होते, पण दिल्लीवरून येत असतानाच विमानाला पक्ष्याची धडक बसल्याचे आढळून आले, त्यामुळे परतीचे उड्डाण रद्द करण्यात आले. प्रवाशांच्या गैरसोयीबद्दल एअर इंडियाने दिलगिरी व्यक्त केली आहे.

## सर्वाधिक आमदारांनी...

शिवसेना पक्षाचा मेळावा मुंबईत संपन्न झाला. यापूर्वी शिवसेना पक्षाचा १९ जून रोजी एकच मेळावा व्हायचा. पण एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखाली शिवसेनेच्या सर्वाधिक आमदारांनी, खासदारांनी, माजी नगरसेवकांनी, पक्षीय पदाधिकाऱ्यांनी उद्धव ठाकरेंच्या अरेरावीला, एककल्ली कारभाराला व सत्तेसाठी हिंदुत्वाला बासनात गुंडाळत काँग्रेसशी युती केल्याच्या निर्णयाचा संताप व्यक्त करत वेगळी राजकीय चूल मांडली. निवडणूक आयोगानेही लोकप्रतिनिधी व पक्षीय पदाधिकाऱ्यांच्या संख्याबळाकडे पाहता एकनाथ शिंदेंची शिवसेना खरी शिवसेना असल्याचा निकाल देत शिवसेना व शिवसेनेचे निवडणूक चिन्ह असलेले धनुष्यबाण एकनाथ शिंदेंच्या स्वाधीन केले. सत्तेसाठी हिंदुत्वाच्या ध्येयधोरणाला तिलांजली देत काँग्रेसशी मांडीला मांडी लावल्याने उद्धव ठाकरे यांना पक्षाचे नाव व निवडणूक चिन्ह गमवावे लागले आणि अखेरीला त्यांना उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना या नव्या नावाने मशाल निवडणूक चिन्हाच्या मदतीने राजकीय वाटचाल करण्याची वेळ आली. एकाच नावसाधर्म्य असलेल्या दोन संघटनांचे मेळावे एकाच दिवशी मुंबईत साजरे झाले. अर्थात वैचारिक मतभेद, राजकीय वाद म्हटल्यावर दोन्ही संघटनांच्या प्रमुखांकडून एकमेकांकडून आरोप-प्रत्यारोप, राजकीय चिखलफेक होणे स्वाभाविकच आहे. याही वेळी दोन्ही संघटनांच्या मेळाव्यामध्ये हाच प्रकार झाला. पक्षाच्या स्थापना दिनाचा मेळावा म्हटल्यावर पक्षाची पार्श्वभूमी, पक्षाची आजवरची वाटचाल, आगामी ध्येयधोरणे यावर विचारविनियम होऊन पदाधिकाऱ्यांना, कार्यकर्त्यांना मार्गदर्शन होणे आवश्यक होते. पण उद्धव ठाकरेंनी आपल्या भाषणामध्ये तोच संवादाचा प्रकार कायम ठेवल्याने उबाठा सेनेच्या सैनिकांना नेहमीप्रमाणे याही मेळाव्यात विचारांची दिशा मिळालीच नाही. माझा बाप चोरला, पक्ष चोरला, निवडणूक चिन्ह चोरले या पलीकडे उद्धव ठाकरेंना पक्षफुटीनंतर विशेष काहीही बोलता आले नाही; परंतु त्यांनी राणा भीमदेवी थाटाचा आवेश निर्माण करत अंगी नसलेले शौर्य दाखविण्याचा केविलवाणा प्रयत्न केला. उद्धव ठाकरे यांच्या आरोपाचा थेट पंचनामा करत शिवसेनेच्या एकनाथ शिंदे यांनी सर्व चिरफाड करत उबाठांचे वस्त्रहरणच केले आहे. उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणातून ‘किल मीफ आणि ‘मला मारायला येताना रुग्णवाहिका घेऊन या, त्याच रुग्णवाहिकेतून परत पाठविले जाईलफ असा इशारा दिला होता. एकनाथ शिंदेंनी ठाकरेंच्या या आरोपाला उत्तर देताना आधीच मेलेल्यांना कोण परत मारणार? विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील मतदारांनी आधीच उबाठाला संपविले आहे. ज्या माणसाला आपल्या पक्षातील फूट थांबविता आली नाही, लोकप्रतिनिधींना तसेच पक्षीय पदाधिकाऱ्यांना पक्षातून बाहेर जाताना थांबविणे शक्य झाले नाही, आजही उबाठा सेनेमध्ये मोठ्या प्रमाणावर गळती सुरूच आहे. ही गळती थांबविणे उबाठा सेनाप्रमुखांना शक्य झाले नाही, त्यांनी रुग्णवाहिकेची भाषा बोलावे, याची एकनाथ शिंदेंनी खिल्ली उडविताना ठाकरेंना त्यांच्या राजकीय ताकदीची जाणीव करून दिली आहे. वर्धापन दिन कार्यक्रमात शिवसैनिकांना मार्गदर्शन करताना पुण्यात घडलेल्या वैष्णवी प्रकरणावरही एकनाथ शिंदेंनी भाष्य करताना घरातील महिलांच्या मान-सन्मानाबद्दल, त्यांच्या रक्षणाबद्दल निर्देश दिले. घरातील सुनांच्या रक्षणाबाबतचा संदेश देताना शिवसेनेच्या ५९ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शिवसेनेच्या नव्या अभियानाची सुरुवात करण्यात आली. हुंडाविरोधी अभियान शिवसेनेने सुरू केले असून याच्या लोगोचे उद्घाटनही या कार्यक्रमात करण्यात आले. महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून हुंडाबळीच्या अनेक घटना पाहायला मिळाल्या आहेत. यामध्ये राजकीय पार्श्वभूमी असलेल्या पदाधिकाऱ्यांच्या घरातही सुनांचा छळ झाल्याने त्यांनीही आत्महत्या केल्याच्या घटनांनी महाराष्ट्राच्या पुरोगामीपणाची मान शरमेने खाली गेली आहे. या पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेने नव्या अभियानाची घोषणा केली. हुंडाबळीची वाढती प्रकरणे मराठी संस्कृतीला बट्टा लावत आहे, हे वेळीच थांबवणे गरजेचे आहे. यासाठीच पुन्हा एकदा शिवसेना सज्ज झाली आहे. जिथे घरातील सुनेचा हुड्यांसाठी छळ केला जाईल, तिथे शिवसेना या घरातल्यांची त्यांना समजेल अशा भाषेत समजूत काढेल. शिवसेनेच्या वाघिणी या पुढाकार घेतील, शिवसेना महिला आघाडी आता सज्ज झाली आहे. महाराष्ट्रातील मुलींच्या, सुनांच्या रक्षणासाठी हुंडामुक्त महाराष्ट्रासाठी ‘लाडक्या सुनेचे रक्षण, हेच आहे शिवसेनेचे वचनफ हे अभियान सुरू केले. पुण्यातील वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणामुळे जनतेमध्ये मोठा असंतोष निर्माण झाला होता. तसेच महाराष्ट्रातील विविध भागांत हुंडाबळीच्या घटना समोर आल्या. याच पार्श्वभूमीवर आता शिवसेनेने हुंडाविरोधात काम करण्यासाठी नवा कार्यक्रम महिला आघाडीला दिला आहे. स्थानिक स्वराज्य संस्था ज्याच्या ताब्यात असतात, त्यांना विधानसभा, लोकसभा निवडणुका लढविणे नाही तर जिंकणेही शक्य असते.पाकिस्तानविरोधातील युद्ध जिंकल्याचा तसेच हिंदुत्ववादी विचारांचाही शिंदेंनी भाषणात उल्लेख करताना हिंदुत्व हाच शिवसेनेचा यापुढील काळातही अजेंडा कायम राहणार असल्याचे स्पष्ट केले. आगामी महापालिका निवडणुकांमध्ये भगवा फडकवण्यासाठी शिवसैनिकांना उत्साहित करण्याचे काम एकनाथ शिंदेंनी या मेळाव्याच्या माध्यमातून केले आहे. मात्र शिवसैनिकांना निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मार्गदर्शन,शिवसेनाप्रमुखांच्या विचारांचा वारसा आणि हिंदुत्वाचे समर्थन शिंदेंच्या नेतृत्वाखालील शिवसेनेतच होत असल्याचे या मेळाव्याच्या माध्यमातून पाहावयास मिळाले.

# बांधावरचे तंटे बंधावरच केले सॉल

## वेलडन: एसपींच्या नाविन्यपूर्ण उपक्रमामुळे न्याय मिळू लागला

**प्रा.शुभम जैन/कडा**



जिल्ह्याचे नवनिर्वाचित पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्या संकल्पनेतून हाती घेण्यात आलेल्या मपोलिस आपल्या बांधावरफ यां नाविन्यपूर्ण उपक्रमामुळे ग्रामीण भागात बांधावरून शेतकऱ्यांमध्ये होणारे वाद-विवाद संपुष्टात येऊ लागलेत. या स्तुत्य उपक्रमांतर्गत अंभोरा पोलीस ठाण्याचे सपोनि मंगेश साळवेंसह त्यांच्या टीमने पुढाकार घेऊन अवघ्या काही दिवसात थेट बांधावर जाऊन बारा वादग्रस्त प्रकरणापैकी नऊ प्रकरणे जागच्या जागी निकाली काढून शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिला. जिल्ह्यात शेतकऱ्यांमध्ये शेताच्या बांधावरून होणारे वाद-विवाद संपुष्टात यावेत, या उदात्त हेतूने जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी मपोलीस आपल्या बांधावरफ हा उपक्रम हाती घेतला. त्यामुळे शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने न्याय मिळू लागला आहे. भविष्यात बांधावरून आपापसात होणारे वाद, त्यातून होणाऱ्या लहान मोठ्या गंभीर गुन्ह्याला आळा बसावा. जीवित व वित्तहानी होऊ नये, याकरिता एसपींच्या या उपक्रमाला ग्रामीण भागातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळू लागला. अंभोऱ्याचे सपोनि मंगेश साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली या ठाण्याच्या बीट अंमलदारांसह पोलीस कर्मचारी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन या उपक्रमांतर्गत पोलिसांनी अवघ्या काही दिवसात शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन बारा वादग्रस्त प्रकरणांपैकी नऊ प्रकरणे जागच्या जागी निकाली काढून संभाव्य वादविवाद संपुष्टात आणून कौतुकास्पद कामगिरी बजावली असून, या स्तुत्य उपक्रमास ग्रामीण भागातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे सकारात्मक चित्र पहावयास मिळत आहे.

> शेत जमिनीच्या अनुषंगाने तक्रार असल्यास एकमेकात वाद न करता पोलिसांशी संपर्क साधावा. पोलीस आपल्या दारी येऊन दोघांचे म्हणणे ऐकून समोपचाराने मार्गी लावतील. त्यातून तोडगा न निघाल्यास सदर प्रकरण ज्या विभागाशी संबंधित असेल, तेथे जाणेबाबत समज देतील. त्यामुळे वादविवाद न करता कायदेशीर मार्गाने तक्रारींचे निरसन करावे.
> **-सपोनी मंगेश साळवे, अंभोरा**

# रस्त्याचे होणार चौपदरीकरण

## पंकजा मुंडेंनी मानले गडकरींचे आभार

पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई:परळी मतदारसंघातील बर्दापूर ते लोखंडी सावरगांव रस्ता रुंदीकरणाला आता गती येणार असून यासाठी भरीव निधीची तरतूद आराखड्यात करण्यात आली आहे, या कामासाठी जनतेला दिलेल्या आश्वासनाची पूर्ती केल्याबद्दल राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांचे आभार मानले आहेत. वधानसभा निवडणुकीच्या वेळेस प्रचार करताना ना. पंकजाताई मुंडे यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या सभेत बर्दापुर ते लोखंडी सावरगाव रस्त्याचे रुंदीकरण करावे अशी मागणी केली होती, हा रस्ता अरूंद असल्याने यावर वारंवार अपघात झाले होते, त्यामुळे ही मागणी पुढे आली होती, यावर गडकरी यांनी रस्त्यासाठी लवकरच निधी देऊन काम सुरू करू असे आश्वासन दिलं होते. याच मागणीसाठी ना.पंकजाताईंनी गडकरी यांची दिल्ली येथे भेटही घेतली होती. रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय, भारत सरकार यांच्या २०२५-२६ च्या वार्षिक आराखड्यात बर्दापूर ते लोखंडी सावरगांव या एकूण १८ किमी लांबीच्या चौपदरीकरणाचा समावेश अधिकृतपणे करण्यात आला असून या कामासाठी २५० कोटींचा खर्च अपेक्षित असून तेवढ्या निधीची तरतूद करण्यात या आराखड्यात करण्यात आली आहे. दरम्यान, जनतेला दिलेल्या आश्वासनाची पूर्ती केल्याबद्दल ना. पंकजाताईंनी गडकरींचे आभार मानले आहेत.

# बांगलादेश अधोगतीकडे...

गेल्या वर्षी बांगलादेशमधील आरक्षणाच्या आंदोलनाला हिंसक वळण लागले. लोकशाही मार्गाने सत्तेत आलेल्या शेख हसीना यांना देशातून पलायन करावे लागले. त्यानंतरच्या काळात या देशाने चीन, पाकिस्तानशी केलेला घरोबा चांगलाच अंगलट आला. भारताशी घेतलेला पंगाही बांगलादेशला महागात पडला. गेल्या दहा महिन्यांमध्ये तिथले उद्योग अडचणीत आले आहेत. प्रगतीकडे झेप घेणाऱ्या देशाची अधोगतीकडे वाटचाल सुरू आहे. बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस यांनी राजीनामा देण्याची इच्छा व्यक्त केल्याच्या बातमीने देशातील राजकीय वादविवाद आणखी तीव्र झाला आहे. ‘नॅशनल सिटीझन्स पार्टीफ (एनसीपी)चे संयोजक नाहिद इस्लाम यांनी या बाबत युनूस यांची भेट घेतली. त्या भेटीमध्ये युनूस यांनी सर्वपक्षीय सहकार्य मिळत नसल्याची भावना व्यक्त केली असली, तरी प्रत्यक्षात त्यांचे वर्तन ‘बांगलादेश नॅशनल पार्टीफला धार्जिणे राहिले आहे. शेख हसीना यांच्या अवामी लीग या पक्षावर त्यांनी बंदी घातली. आता तर युनूस आणि बांगलादेशच्या लष्कर प्रमुखामध्ये शीतयुद्ध सुरू झाले आहे. बांगलादेशचे परराष्ट्र सचिव जशीमुद्दीन यांच्या अचानक राजीनाम्यामुळे युनूस यांच्याही राजीनाम्याची चर्चा सुरू झाली. युनूस यांनी सांगितले की सर्व राजकीय पक्षांमध्ये एकमत नसेल, तर ते काम करू शकत नाहीत. वस्तुत: एका जनआंदोलनानंतर मोहम्मद युनूस यांची या पदासाठी निवड झाली, पण आता ज्या पद्धतीने आंदोलन सुरू आहे आणि त्यांना ज्या प्रकारे ओलीस ठेवले जात आहे, त्या स्थितीत काम करणे शक्य नाही. काहींनी मनधरणी केल्यानंतर युनूस यांनी त्यांच्या राजीनाम्याच्या मुद्द्यावर विचार करण्याचे आश्वासन दिले आहे. दरम्यान, ‘जमात-ए-इस्लामीफचे अमीर शफीकुर रहमान यांनी देशातील सध्याची परिस्थिती लक्षात घेऊन लवकरच सर्वपक्षीय बैठक बोलावण्याचे आवाहन युनूस यांना केले आहे; मात्र बांगलादेशच्या अंतरिम सरकारने अवामी लीगवर बंदी घातली. लष्करप्रमुख वकार-उझ-जमान यांनी डिसेंबरपर्यंत सार्वत्रिक निवडणुका घेण्याचे आवाहन केले.




गेल्या वर्षी एका मोठ्या जनआंदोलनातून हंगामी सरकार आले, तेव्हा हे सरकार अल्पकाळ असेल आणि तिथल्या संसदेच्या निवडणुका लवकर घेतल्या जातील, असे सांगण्यात आले होते; परंतु गेल्या दहा महिन्यांमध्ये निवडणुका झालेल्या नाहीत. आता लष्करप्रमुख वकार-उझ-जमान यांनी सरकारला मुदत घालून दिली आहे. पुढील सात महिन्यांमध्ये बांगलादेशमध्ये निवडणुका घ्याव्या लागतील. गेल्या वर्षी आंदोलन होईपर्यंत बांगलादेशचा जीडीपी आशिया खंडात नोंद घेण्यासारखा होता. या देशातून जगभर निर्यात होत होती. विशेषतः कापड उद्योगाने जगभरात नावलौकिक कमावला होता. गेल्या दहा महिन्यांमध्ये मात्र बांगलादेशमधील हिंसाचार आणि भारतविरोधी भूमिकेमुळे बांगलादेशची कोंडी झाली आहे. चीन मदत करत असला, तरी तो काहीही फुकट करत नाही. ज्या पश्चिम पाकिस्तानच्या छळाला कंटाळून बांगलादेशची निर्मिती झाली, त्यानेच आता पाकिस्तानसोबत जुळवून घेतले आहे. अतिरेकी संघटनांना रान मोकळे केले आहे. भारताने आर्थिक कोंडी केल्याचा परिणाम म्हणून बांगलादेशची निर्यात महागणार आहे. भारताने बांगलादेशच्या मुक्तीसंग्रामात महत्त्वाची भूमिका बजावली; परंतु तोच बांगलादेश आता भारताविरोधात गरळ ओकत आहे. त्याचा परिणामही त्यालाच भोगावा लागतो आहे. भारताने बांगलादेशला ‘मोस्ट फेवर्ड नेशनफचा दर्जा दिला होता. भारतीय कापड उद्योगाला नुकसान सहन करून बांगलादेशसाठी दरवाजे खुले केले होते. आता भारताने बांगलादेशच्या या सवलती काढून घेतल्या आहेत. त्यामुळे या देशाचा वस्त्रोद्योग तसेच अन्य उद्योग अडचणीत आले आहेत. दुसरीकडे, ‘बीएनपीफचे सदस्य मिर्झा फखरुल इस्लाम यांनी म्हटले आहे की, देशाच्या लोकशाही भविष्यावर ‘नवीन काळी सावलीफपसरत आहे. निवडणुका लांबणीवर टाकण्यासाठी आणि नागरिकांना त्यांच्या मतदानाच्या अधिकारापासून वंचित ठेवण्यासाठी एक सुनियोजित कट रचला जात आहे. धोक्यात आलेली लोकशाही व्यवस्था, सातत्याने सुरू असलेला हिंसाचार यामुळे कुणीच बांगलादेशमध्ये गुंतवणूक करण्यास धजावत नाही. बांगलादेश मुक्ती युद्धादरम्यान पाकिस्तानी सैन्याने शरणागती पत्करली, तेव्हा दक्षिण आशियातील या नव्याने स्वतंत्र झालेल्या देशाची अर्थव्यवस्था वाईट स्थितीत होती. देशातील ८० टक्के लोकसंख्या अत्यंत गरिबीमध्ये जगत होती. त्यानंतर पुढील काही वर्षे बांगलादेश लष्करी उठाव, राजकीय संकट, गरिबी आणि दुष्काळाशी झुंजत राहिला. पाच वर्षांपूर्वी मात्र या देशाची परिस्थिती पूर्वीपेक्षा खूपच चांगली झाली होती. विकासवाटेवरील अग्रणी म्हणून बांगलादेशकडे पाहिले जात होते. त्याच्या विकासावर सर्वांच्या नजरा खिळल्या होत्या.

बांगलादेशचा सामाजिक-आर्थिक विकास आणि लोकांच्या उत्पन्नात झालेली असाधारण वाढ पाहून जग थक्क होत होते. तिथल्या लोकांचे उत्पन्न दहापट वाढले होते. बांगलादेश विकासात पुढे जात होता. कोरोनापूर्वी बांगलादेशची अर्थव्यवस्था खूप वेगाने वाढत होती. त्याचा वार्षिक आर्थिक विकास दर आठ टक्के होता. साथीच्या आजाराचा सामना करत असूनही बांगलादेशची अर्थव्यवस्था वेगाने रुळावर येत होती. बांगलादेश सुमारे १६७ दशलक्ष लोकसंख्येला पुरेल इतके अन्नधान्य पिकवतो. येथील माता आणि बालमृत्यू दरही लक्षणीयरीत्या कमी झाला होता. २०१५ मध्ये बांगलादेशने कमी-मध्यम उत्पन्न असलेल्या देशाचा दर्जा प्राप्त केला. तो संयुक्त राष्ट्रांच्या ‘अल्प विकसित देशांच्याफ यादीतून बाहेर पडण्याच्या मार्गावर होता. या देशातील ९८ टक्के मुलांनी प्राथमिक शिक्षण घेतले असून माध्यमिक शाळांमध्ये मुलांपेक्षा मुलींची संख्या जास्त आहे. अलीकडच्या काळात मुस्लीमबहुल राष्ट्राने मुली आणि महिलांचे जीवन सुधारण्यासाठी मोठी गुंतवणूक केली होती. बालकुपोषण आणि पुनरुत्पादक आरोग्याच्या मुद्द्यावरही त्यांनी प्रगती केली होती. मुलींच्या शिक्षणाच्या परिस्थितीत सुधारणा झाल्यामुळे बांगलादेशची सामाजिक-आर्थिक रचना बदलली. मुली आणि महिलांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देणे हीदेखील एक येथे महत्त्वाची बाब ठरली. आता महिला पूर्वीपेक्षा जास्त बोलक्या आहेत. त्या चार दशकांपूर्वी होत्या तितक्या लाजाळू नाहीत. शेतीपासून उद्योगांपर्यंत बांगलादेश जगातील ३७ व्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था झाली होती. त्याचा जीडीपी ४०९ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त आहे. २०३० पर्यंत त्याची अर्थव्यवस्था दुप्पट होण्याचा अंदाज विविध संस्था व्यक्त करत होत्या; परंतु गेल्या वर्षी आरक्षणाचे निमित्त झाले आणि बांगलादेशला दिशा देणाऱ्या शेख हसीना यांना देश सोडून जावे लागले. त्यांच्या पक्षाचे अनेक नेते तुरुंगात आहेत. त्यांचा पक्ष मध्यममार्गी होता. कट्टरवाद्यांपेक्षा त्यांची विकासाची दृष्टी आणि धोरणे चांगली होती; परंतु अंतरिम सरकारच्या भूमिकेमुळे देश पुन्हा कट्टरवाद्यांच्या हाती गेला आणि त्याची प्रगतीकडून अधोगतीकडे वाटचाल सुरू झाली.

## पान सहा वरुन

### राष्ट्रीय महामार्गाच

असंख्य अपघात घडण्याचा धोका निर्माण झाला आहे आणि याच ठिकाणी अपघात घडले आहेत त्यामुळे प्रवाशांना आणि वाहनधारकांना स्वतःचा जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. सदरचे काम तात्काळ पुर्ण करण्यात यावे. काम सुरु न झाल्यास सोमवार, दि. ३० जुन सकाळी ०९.०० वाजता ईटके कॉर्नर येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात इशारा दिला आहे. या ग्रामपंचायत दाऊतपूर, वडगाव दा., सेलू (प.), लोणी, वसंतनगर कासारवाडी, नंदनज, सारडगाव, मांडवा, मिरवट इत्यादी रस्ता रोको मध्ये सहभागी होणार आहेत. सदरील निवेदनाच्या प्रति मंत्री ना.पंकजाताई मुंडे, माजी मंत्री धनंजयजी मुंडे, जिल्हाधिकारी बीड, उपविभागीय अधिकारीपरळी वैजनाथ,जि. तहसिलदार, परळी वैजनाथ, मुख्याधिकारी, न.प. परळी वैजनाथ, पोलीस निरिक्षक, शहर पोलीस स्टेशन. परळी वैजनाथ, मा. पोलीस निरिक्षक ग्रामीण पोलीस स्टेशन. परळी वैजनाथ यांना दिल्या आहेत. अशी माहिती सरपंच श्रीकांत (कांताभाऊ) फड यांनी दिली आहे.

### हनुमान व्यायाम

योगाचे प्रशिक्षण दिले. त्यांनी २१ प्रकारची योगासने करुन घेत त्यांचे शरीरावर होणारे परिणामांची माहिती दिली. यावेळी हनुमान व्यायाम शाळेचे जेष्ठ मार्गदर्शक दत्ताप्पा ईटके गुरुजी, त्रिंबक आप्पा काटकर, चंद्रकांत समशेट्टे, अमर देशमुख सर, नरसिंग देशमुख, महादेव आप्पा गडकरी, पत्रकार अनंत भातांगळे सर, माजी नगराध्यक्ष वैजनाथ जगतकर, माजी नगरसेवक महादेव ईटके, महादेव पवार,पवन साळूंके, डिगांबर नागराळे, आकाश गित्ते, देवलिंग चाटे, महारुद्र मिसाळ, बालाजी नव्हाडे, गणेश आरसुडे, नागेश मेंडले, ओमकार वालेवाडे, झालेवाड सर, विनायक विमलवार, रोहण खडकेसह आदि उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक व आभार हनुमान व्यायाम शाळेचे अध्यक्ष वैजनाथ ईटके यांनी केले. हनुमान व्यायाम शाळेचे सर्व विश्वस्त व शिक्षक, विद्यार्थी,नागरीक सहभागी झाले होते.

### दात शरीर आरोग्याच

आरोग्याचे प्रवेशद्वार असल्याचे सांगीतले. ते पुढे म्हणाले की, घकाघकीच्या जीवनात डेंटीस्ट कडुन किमान ठरावीक वेळेनी दात क्लीनिंग करणे ही मएकंदर आरोग्य जपणारी चांगली सवयफ असल्याचे ही सांगितले.

### सिरसाळा येथे अवैध

५० हजार रू. व ट्रॉलीमध्ये अंदाजे एक ते सव्वा ब्रास वाळु असलेली किं. अंदाजे ७ हजार रू. असा एकूण ४ लक्ष ५७ हजार रूपये चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस कर्मचारी वंजारे करत आहेत.

### महिलांना तीन वर्षांपासून

आम्हाला संधी मिळाली आहे. महिलांनी एकत्र येऊन योगा ग्रुप तयार करावेत, त्या माध्यमातून बचत गट स्थापन करावेत. योगा मुळे महिलांचे आरोग्य चांगले राहते. त्या शिवाय, स्वावलंबनाचा मार्ग आयुष्यात अंत्यत गरजेचा असल्याचे ही, सौ. पवार यांनी शेवटी बोलताना सांगितले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी योग गुरु अनुसया मुनेश्वर, प्रमुख पाहुणे म्हणून डॉ ऋतुजा मुंढे या होत्या. गायकवाड सर व चाळक सर यांनी योगा बद्दल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुशिल टकले सर यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रत्नमाला नानी मोटे, माधुरी कुरकुटे यांच्यासह जिजामाता योगा ग्रुपच्या महिलांचे सहकार्य लाभले.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com



## संत तुकाराम महाराजांच्या पादुकांचे आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते पूजन

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते पहाटे ४.०० वाजता आकुर्डी येथील श्री विठ्ठल रखुमाई मंदिरात जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या पादुकांचे पूजन व आरती करण्यात आली. दर्शन व पूजेनंतर आयुक्त शेखर सिंह यांचा आकुर्डी येथील विठ्ठल मंदिर संस्थानच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी माजी नगरसदस्य प्रमोद कुटे, कुंडलीक महाराज मोरे, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, सह शहर अभियंता नितीन देशमुख, उपआयुक्त सचिन पवार, क्षेत्रिय अधिकारी निवेदिता घार्गे, अतुल पाटील, किशोर ननवरे, कार्यकारी अभियंता विजय भोजने, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सामाजिक कार्यकर्ते संतोष कुटे, प्रवीण कुटे, तुकाराम कुटे, गिरीश कुटे तसेच नागरिक उपस्थित होते. महापूजेनंतर विठू नामाच्या घोषात जगद्गुरू संत तुकाराम महाराज पालखीचे पुण्याच्या दिशेने प्रस्थान झाले.

# पुणे शहराच्या प्रवेशद्वाराजवळचा रस्ता गेला पाण्याखाली!

### नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

◆ पुणे (प्रतिनिधी) :

गेल्या दोन दिवसांपासून शहर आणि परिसरात पडत असलेल्या पावसामुळे शहरातून वाहणाऱ्या मुळा मुठा नदीच्या पाण्यात वाढ झाली आहे. या नद्या दुथड्या भरून वाहत असून खडकवासला तसेच पवना धरण परिसरात मुसळधार पाऊस पडल्याने खबरदारीचा उपाय म्हणून धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे.

मावळ येथील पवना धरणातून पाणी सोडले जात असल्याने नद्यांच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. पुणे शहराचे प्रवेशद्वाराजवळील आणि पुणे शहर आणि पिंपरी-चिंचवड शहराला जोडणाऱ्या बोपोडी येथील हॅरीस पुलाखालील रस्ता पाण्याखाली गेला आहे. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासनाने हा रस्ता वाहतुकीसाठी बंद केला आहे. गुरुवारी रात्री ११.३० वाजता हा रस्ता बंद करण्यात आला. पुणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी यांनी ही माहिती दिली.

गुरुवारी सकाळपासून पुणे शहर आणि पिंपरी-चिंचवड परिसरात पावसाने जोरदार हजेरी लावली होती. अनेक भागात मुसळधार पाऊस झाल्याने रस्त्यांवर पाणी साठले होते. त्यामधून वाट काढताना वाहनचालकांना कसरत करावी लागत होती. सतत पडत असलेला पाऊस आणि रस्त्यावर साठलेले पाणी यामुळे शहरातील अनेक भागात वाहतूक कोंडी झाली होती.

रस्त्यावर झालेल्या या वाहतूक कोंडीचा फटका कामाला येताना आणि कामावरून घरी जाताना नागरिकांना बसला. गुरुवारी रात्री मध्यरात्रीपर्यंत कमी अधिक प्रमाणात पाऊस सुरूच होता.



### खडकवासला धरणातून नऊ हजार क्युसेक पाणी

खडकवासला धरणातून गुरुवारी दुपारी १ वाजता सुमारे २ हजार क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला होता. त्यानंतर त्यामध्ये वाढ करत चार हजार क्युसेक तर रात्री उशिरा नऊ हजार क्युसेक पाणी नदीत सोडण्यात येत होते. त्यामुळे मुठा नदीच्या काठी राहणाऱ्या नागरिकांना विशेष सतर्क राहण्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे. अनावश्यक प्रवास आणि नदीकाठी फिरणे टाळण्याचे आवाहन करण्यात आले असून, कृपया कोणीही नदीपात्रात उतरू नये, असे स्पष्टपणे सांगण्यात आले आहे. तसेच नदीपात्रात जनावरे अथवा तत्सम साहित्य असल्यास ते तातडीने काढून घ्यावे. पाणी शिरण्याची शक्यता असलेल्या भागांतील नागरिकांना योग्य सूचना देण्याचे आदेश क्षेत्रीय कार्यालयातील सहाय्यक आयुक्तांना देण्यात आले आहेत.

### प्रशासनाकडून हा रस्ता बंद

पुणे महापालिकेच्या औंध बाणेर क्षेत्रिय कार्यालयाच्या हद्दीत हा भाग येतो. पिंपरी-चिंचवड शहराकडून पुणे महापालिकेच्या हद्दीत प्रवेश करून हॅरिस ब्रिजवरून बोपोडी, औंध तसेच पुणे विद्यापीठाकडे जाण्यासाठी वाहनचालक या रस्त्याचा उपयोग करतात. दरवर्षी पावसाळ्यामध्ये नदीला पूर आल्यानंतर खबरदारीचा उपाय म्हणून महापालिका प्रशासन तसेच पोलीस प्रशासनाकडून हा रस्ता बंद केला जातो. यंदा जून महिन्यात पहिल्यांदाच हा रस्ता वाहतुकीसाठी बंद झाला आहे.

संवेदनशील मुद्द्याबाबत महापालिकांची बेफिकिरी

# अखेर पूरनियंत्रण कक्षाला कर्मचाऱ्यांचा पुरवठा

◆ पुणे (प्रतिनिधी) :

जलसंपदा विभागाने दोन्ही महापालिकांसोबत स्थापन केलेल्या पूर नियंत्रण कक्षासाठी अखेर मनुष्यबळ उपलब्ध झाले आहे. पुणे आणि पिंपरी महापालिकेने प्रत्येकी सहा कर्मचारी या कक्षासाठी दिले आहे. हा कक्ष चोवीस तास सुरू राहणार आहे. प्रत्येक आठ तासांच्या कालावधीत जलसंपदा आणि महापालिकेचे प्रत्येकी दोन कर्मचारी कार्यरत राहतील. आपत्कालीन परिस्थितीत अर्थात पूरस्थिती निर्माण होण्यापूर्वी महापालिका आणि अन्य यंत्रणांना खडकवासला प्रकल्पातील पाणीसाठा ७० टक्क्यांपर्यंत आल्यास पूरस्थितीची पूर्वसूचना देण्यात येईल. त्यानंतर पुन्हा ९० टक्क्यांवर साठा येताच त्याची माहिती दिली जाणार आहे.

गेल्या वर्षी खडकवासला धरण परिसरात तसेच शहर परिसरात मोठ्या प्रमाणावर पाऊस होऊन नदीपात्रात पाणी सोडण्यात आले. हे पाणी सिंहगड रस्त्यावरील एकतानगरी शिरल्यानंतर पूरस्थिती निर्माण झाली. पूर्वसूचना न देता धरणातून अतिरिक्त पाणी सोडल्याची टीका जलसंपदा विभागावर करण्यात आली होती. त्या पार्श्वभूमीवर जलसंपदा विभागाने नियंत्रण कक्ष स्थापन केला आहे. हा नियंत्रण कक्ष खडकवासला विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांच्या देखरेखीखाली काम करणार आहे. या नियंत्रण कक्षात पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या काही कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याचे ठरले होते. तसेच जलसंपदा विभागाचे ३ कर्मचारी २४ या ठिकाणी कार्यरत राहणार आहेत.




> जलसंपदा विभागाने २२ मे रोजी पुणे व पिंपरी महापालिकेला कर्मचारी पुरविण्याबाबत पत्र दिले होते. मात्र, त्यावर निर्णय घेण्यात आला नव्हता. त्यानंतर ५ जून रोजी दुसरे स्मरणपत्रही देण्यात आले तरीही कर्मचारी देण्यात आले नव्हते. यावरून या संवेदनशील मुद्द्याबाबत महापालिकांची बेफिकीर असल्याचे दिसून आली होती. पुणे आणि पिंपरी-चिंचवड या दोन्ही महापालिकांना पत्र दिले होते. दोन्ही महापालिकांना कर्मचारी दिल्याने कक्षाचे काम सुरू झाले आहे.
>
> - **श्वेता कुर्हाडे**, कार्यकारी अभियंता, खडकवासला प्रकल्प

## वेचक

### सीए संस्थेच्या वतीने वारकऱ्यांना रेनकोटचे वाटप



**पिंपरी :** निगडी येथील दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या पिंपरी-चिंचवड शाखेच्या वतीने वारकऱ्यांना रेनकोटचे वाटप करण्यात आले. यावेळी निगडी येथील आयसीएआय भवनमध्ये आयोजित करण्यात आलेल्या महाप्रसादाचा अनेक वारकऱ्यांनी लाभ घेतला. यावेळी वारकऱ्यांना आर्थिक साक्षरता याविषयी अश्विनी सुरती यांनी मार्गदर्शन केले. यावेळी आयसीएआयचे शाखाध्यक्ष सीए वैभव मोदी, उपाध्यक्षा सीए सारिका चोरडिया, सचिव सीए मनोज मालपाणी, खजिनदार सीए महावीर कोठारी, विद्यार्थी संघटना अध्यक्ष सीए धीरज बलदोटा, कार्यकारी सदस्य सीए शैलेश बोरे व सीए सचिन ढेरंगे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# वाहतूक व्यवस्थेत केलेले बदल, ठरले फेल

### नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात रोष व्यक्त



◆ पुणे (प्रतिनिधी) :

पालखी सोहळ्यात भाविकांची होणारी गर्दी विचारात घेऊन वाहतूक पोलिसांनी बंदोबस्ताची आखणी केली होती. पालखी सोहळ्याचे आगमनानिमित्त शहरातील वाहतूक व्यवस्थेत मोठे बदल करण्यात आले. पण, शहराच्या मध्यवर्ती भागात प्रचंड वाहतूक कोंडी झालेली पाहायला मिळाली. शहरात बाहेरगावाहून येणाऱ्या वाहनांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा असे आवाहन ही करण्यात आले होते. मात्र पालखीचे आगमन शहरात होण्यापूर्वीच ठिकठिकाणी बॅरिकेडस आणि बांबू लावून रस्ते बंद करण्यात आले. यामुळे शहराच्या मध्यवर्ती परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती.

रेंजहिल चौक ते संचेती चौक, डेक्कन जिमखाना येथील खंडोजीबाबा चौक ते वीर चापेकर चौक, गाडगीळ पुतळा चौक ते स. गो. बर्वे चौक, आपटे रस्ता, नामदार गोपाळकृष्ण गोखले रस्ता ते टिळक रस्ता, लक्ष्मी रस्ता, शनिपार चौक ते सेवासदन चौक, नेहरू चौक ते सोन्या मारुती चौक, गणेश रस्त्यावरील देवजीबाबा चौक ते हमजेखान चौक, नेहरू रस्त्यावरील रामोशी गेट ते पालखी विठोबा मंदिर, संत कबीर चौक ते चाचा हलवाई चौक हे मार्ग वाहतुकीसाठी बंद होते. याचा परिणाम प्रचंड वाहतूक कोंडी होण्यावर झाला होता. नागरिकांना मोठ्या प्रमाणात मनस्ताप सहन करावा लागत होता. यातच वारीतील हजारो ट्रक आपल्या मुक्कामाच्या ठिकाणी सकाळीच दाखल झाले होते. यामुळे गल्लीबोळातील वाहतुकीसही अडथळा निर्माण झाला होता. याचा परिणाम मात्र उलटा झाला. वाहनचालकांनी गल्लीबोळातून वाहने घालत शहरातील मध्यवर्ती भागच जाम करून टाकला. वाहतूक कोंडी लक्षात घेऊन बंद केलेले रस्ते खुले करून वाहनांना मार्ग करून देणे आवश्यक होते. मात्र कर्तव्यावरील वाहतूक अधिकाऱ्यांनी कोणतीही तत्परता दाखवली नाही. यामुळे नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात रोष व्यक्त करण्यात येत होता.

### वाहतूक शाखेतील अधिकाऱ्यांकडून असमर्थता

पालखी सोहळा मुक्कामी आल्यानंतर नाना आणि भवानी पेठेतील रस्ते वाहतुकीसाठी बंद ठेवण्याचा निर्णय वाहतूक शाखेने घेतला होता. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर, शनिवार वाडा परिसरात वारकरी गर्दी करत असल्याने शुक्रवार ते रविवारी सकाळी अकरापर्यंत शिवाजी रस्ता आणि लक्ष्मी रस्ता वाहतुकीसाठी बंद ठेवण्याचा निर्णय घेतला गेला.

# प्रत्येक महिलेने योगाभ्यास करणे गरजेचे

### योग दिनाचे औचित्य साधून वस्ती भागातील १००० मुलींची योग प्रात्यक्षिके

◆ पुणे (प्रतिनिधी) :



छाया : मंदार टण्णू

महिलांचे जीवन अतिशय खडतर असते. त्यांना घरातील विविध जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. त्यामुळे अनेकदा त्यांचे तब्येतीकडे दुर्लक्ष होत असते. आनंदी जीवनासाठी प्रत्येक महिलेने योगाभ्यास करणे आवश्यक आहे असे मत यावेळी व्यक्त केले.

मानसी उपक्रमामुळे कोथरुडमधील वस्ती भागातील मुलींना योगाभ्यासाची गोडी निर्माण झाली असून, आगामी काळात पुणे शहरातही हा उपक्रम मोठ्या प्रमाणात राबवू, अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली. जागतिक योग दिनाचे औचित्य साधून ना. चंद्रकांतदादा पाटील यांच्या संकल्पनेतून कोथरुड मतदारसंघातील वस्ती भागातील मुलींसाठी सुरू केलेल्या 'मानसी' उपक्रमातील मुलींचे एकत्रिकरण महालक्ष्मी लॉन्स येथे करण्यात आले होते. जवळपास एक हजारपेक्षा जास्त मुलींनी या कार्यक्रमात सहभागी होऊन योग प्रात्यक्षिके सादर केली. यावेळी माजी नगरसेविका मोनिका मोहोळ, उद्योजिका स्मिता पाटील, भाजपा दक्षिण मंडल अध्यक्ष कुलदीप सावळेकर, माजी अध्यक्ष डॉ. संदीप बुटाला, योग गुरू मुग्धा भागवत, माजी नगरसेविका छाया मारणे यांच्या सह इतर मान्यवर उपस्थित होते.

पाटील म्हणाले की, आजच्या आधुनिक युगात महिला कोणत्याही क्षेत्रात कमी नाहीत. स्त्रित्वाने मासिक पाळी, प्रसूती वेदना, अशा विविध आव्हानांवर मात करत, त्या कुटुंबातील विविध जबाबदाऱ्या पार पाडून, आपापल्या क्षेत्रात नावलौकिक कमावत आहेत. या सर्वांमध्ये अनेकदा त्यांचे स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे यातून त्यांना गंभीर आजारांचा सामना करावा लागतो. अशा काळात योगाभ्यास हे त्यांच्यासाठी अतिशय आवश्यक आहे, अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली. दरम्यान, या कार्यक्रमाअंतर्गत मानसी उपक्रमातील १००० मुलींनी योगाची प्रात्यक्षिके सादर केली. तसेच, काही महिलांनीही पारंपरिक वेशभूषेत योगाची प्रात्यक्षिके सादर केली.

# वारकऱ्यांची नि:स्वार्थ सेवा म्हणजे पांडुरंगाचा प्रसाद

### वारकऱ्यांसाठी फिरता दवाखाना उपक्रमाचा शुभारंभ



◆ पुणे (प्रतिनिधी) :

"गेल्या २५ वर्षांपासून ज्ञानोबा-तुकोबाची पालखी खांद्यावर घेऊन निघालेल्या वारकऱ्यांना आरोग्य सेवा पुरविण्याचे सत्कर्म हे खरोखर पुण्यच आहे. टाळ-मृदंगाच्या नादात, विठू नामाच्या गजरात पंढरीच्या दिशेने निघालेल्या लाखो वारकऱ्यांची सेवा करण्याचा उपक्रम स्तुत्य आहे. अथक परिश्रम घेऊन निःस्वार्थ मनोभावे वारकऱ्यांची सेवा करणारे सर्वजण पंढरीचे 'वारीवीर'च आहेत," अशी भावना राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली. सिंबायोसिस विद्यापीठ रुग्णालय आणि संशोधन केंद्र, सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठ आणि सौ. शीला राज साळवे मेमोरियल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज व संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज पालखी सोहळ्यानिमित्त वारकऱ्यांसाठी फिरता दवाखाना उपक्रमाचा शुभारंभ गुरुवारी झाला.

यंदा या उपक्रमाचे रौप्य महोत्सवी वर्ष असून, १० सुसज्ज मोठ्या अँब्युलंस, पाच दुचाकी अँब्युलंस व ३०० हुन अधिक डॉक्टर्स, नर्स आणि स्वयंसेवकांची टीम देहभान हरपून काम करणार आहे. वेदनाशामक गोळ्या, औषधे, प्रथमोपचार यासह तातडीची आरोग्यसेवा व आपत्कालीन सेवा पुरवली जाते. पुण्यापासून जेजुरीपर्यंत हा फिरता दवाखाना कार्यरत असेल.

चंद्रकांत पाटील म्हणाले, "सलग २५ वर्षे अविरतपणे सुरू असलेला हा उपक्रम महत्त्वाचा आहे. वारकऱ्यांच्या सेवेत विठ्ठल-रुक्मिणीचा आशिर्वाद असतो. स्वयंशिस्त असलेल्या या वारी सोहळ्यात सेवेची संधी ईश्वरभक्ती असते. पालखी सोहळ्यात विविध स्वरूपात सेवा देणाऱ्या संस्थांची संख्या मोठी आहे.

पंढरीच्या दिशेने चालताना त्यांची सेवा करण्याची संधी हा पांडुरंगाचा आशीर्वाद आहे. "डॉ. शां. ब. मुजुमदार म्हणाले, "एका अँब्युलन्सपासून सुरू झालेला हा प्रवास १० पेक्षा अधिक अँब्युलन्सवर गेला आहे. हा फिरता दवाखाना वारकऱ्यांचा शीण उतरण्याचे काम करतो. हा उपक्रम वारी असेल, तोवर अविरतपणे सुरू राहील. राज्यभरातून वारकरी आळंदी व देहूमध्ये दाखल झाले आहेत. परदेशातून, परप्रांतातून आलेल्या विद्यार्थ्यांना हा अनुभव समृद्ध करणारा असतो."

# 'नैसर्गिक नाले बुजविणाऱ्यांवर गुन्हे दाखल करा'

◆ पिंपरी (प्रतिनिधी) :



आयटीनगरी हिंजवडीतील अनेक नैसर्गिक नाले बांधकाम व्यावसायिक, कंपनी मालकांनी बुजविले आहेत. काही नाले वळविले आहेत. नियमांचा भंग करून बांधकामे केली आहेत. मैलामिश्रित पाणी ओढ्यात सोडले जाते. त्यामुळे हिंजवडीतील रस्ते जलमय होत आहेत. त्यासाठी नैसर्गिक नाले बंद करणाऱ्या, वळविणाऱ्या बांधकाम व्यावसायीक, कंपनी मालकांवर गुन्हे दाखल करण्याची सूचना शिवसेनेचे खासदार श्रीरंग बारणे यांनी पीएमआरडीएच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

हिंजवडी वाहतूक कोंडी व नाल्यांच्या समस्यांसाठी खासदार बारणे यांनी गुरुवारी पीएमआरडीए, एमआयसीडी, प्रदूषण महामंडळाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. आमदार शंकर मांडेकर, पीएमआरडीएचे आयुक्त योगेश म्हसे, अतिरिक्त महानगर आयुक्त दीपक सिंगला, पीएमआरडीएच्या मुख्य अभियंता रिनाज पठाण, आदी ग्रामस्थ बैठकीस उपस्थित होते.

खासदार बारणे म्हणाले, आयटीनगरी हिंजवडीत कामासाठी जाणारे नागरिक पिंपरी-चिंचवड शहरात वास्तव्यास आहेत. वाकड, थेरगाव, पिंपळेसौदागर, रहाटणीत वास्तव्यास आहेत. या नागरिकांना हिंजवडीला जाण्यासाठी विविध अडथळ्यांचा सामना करावा लागत आहे. हिंजवडीत पाणी साचत असल्याने वाहतूक कोंडीचा मनस्ताप सहन करावा लागत आगे. बांधकाम व्यावसायीक, खासगी कंपन्यांनी हिंजवडीतील नैसर्गिक नाले बुजविले आहेत. मैलामिश्रित पाणी ओढ्यात सोडले जाते. त्यामुळे पावसाचे पाणी जाण्यास मार्गच नाही. परिणामी, पाणी रस्त्यावर साचून राहते रस्ते जलयम होत आहेत.

मुळातच रस्ते अरुंद आहेत. त्यात महामेट्रोचे काम सुरू आहे. त्यामुळे वाहतुकीचा बोजवारा उडाला आहे. रस्त्यावर अनधिकृत बांधकामे झाली आहे. रस्ते मोकळे करावेत. नाले बुजविणे, वळविणे आणि रसायनमिश्रित पाणी सोडणाऱ्या कंपन्या, बांधकाम व्यावसायिकांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे निर्देश खासदार बारणे यांनी अधिकाऱ्यांना दिले.

# क्यूएस वर्ल्ड रँकिंग जाहीर

◆ पुणे (प्रतिनिधी) :




क्यूएस वर्ल्ड रँकिंग जाहीर झाले असून त्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे रँकिंग वाढले आहे. ऑल स्टेट युनिव्हर्सिटी रँकिंगमध्ये पुणे विद्यापीठ महाराष्ट्रात पहिल्या क्रमांकावर, तर देशात स्टेट यूनिवर्सिटी रँकिंगमध्ये दुसऱ्या क्रमांकावर आहे. ऑलओव्हर रँकिंगमध्ये पुणे विद्यापीठाचा ५६६ वा क्रमांक असून सर्व इंस्टिट्यूट व विद्यापीठांच्या रँकिंगमध्ये पुणे विद्यापीठात भारतात १३ व्या क्रमांकावर आहे.

जगभरातील शैक्षणिक संस्थांचे क्यूएस वर्ल्ड रँकिंग जाहीर झाले असून त्यात दिल्ली विद्यापीठ ३२८ व्या क्रमांकावर, अण्णा विद्यापीठ ४५६ व्या क्रमांकावर आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मागील वर्षी ६३१ ते ६४० च्या दरम्यान होते; परंतु यंदा विद्यापीठाच्या रँकिंगमध्ये ५६६ पर्यंत वाढ झाली आहे. क्यूएस वर्ल्ड रँकिंगमध्ये मुंबई विद्यापीठ ६६४ व्या क्रमांकावर आहे, तर सिम्बॉयसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी ६९६व्या क्रमांकावर आहे. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी दिल्ली १२३ व्या, आयआयटी बॉम्बे १२९ व्या, आयआयटी मद्रास १८० व्या, आयआयटी खरगपूर २१५ व्या, आयआयटी कानपूर २२२ व्या, आयआयटी गुवाहाटी ३३४ व्या क्रमांकावर आहे, तर जेएनयू अर्थात जवाहरलाल नेहरू विद्यापीठ ५५८ व्या क्रमांकावर आहे.

## पालखी सोहळ्यात अग्निशमन दल तैनात

**पुणे :** संभाव्य दुर्घटना विचारात घेऊन पुणे महापालिकेच्या अग्निशमन दलाचे जवान आणि वाहन यंदाही पालखी सोहळ्यात सहभाग होणार आहे. अग्निशमन दलाचे जवान पालखी सोहळ्यात सहभागी होणार असून, श्रीक्षेत्र पंढरपूरपर्यंत जवान आणि वाहन तैनात राहणार आहे. पालखी सोहळ्यात लाखो भाविक सहभागी होतात, आग लागणे, तसेच एखादी दुर्घटना घडल्यास त्वरीत मदत उपलब्ध व्हावी, तसेच दुर्घटना टाळण्यासाठी यंदाही श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात पुणे महापालिकेच्या अग्निशमन दलाचे जवान सहभागी होणार आहेत. अग्निशमन दलाचे एक वाहन, एक अधिकारी आणि सहा जवान गुरुवारी श्रीक्षेत्र आळंदीत दाखल झाले. श्री ज्ञानेस्वर महाराज आणि श्री तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा शुक्रवारी शहरात दाखल झाला.

आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर वारकऱ्यांच्या सेवेत

# जिल्हा परिषदेच्या वतीने शौचालयांसाठी 'टॉयलेट सेवा' ॲप

◆ पुणे (प्रतिनिधी) :

पालखी २०२५ दरम्यान आषाढी वारीमध्ये सहभागी होणाऱ्या लाखो भाविकांना स्वच्छ व सुरक्षित सुविधा मिळाव्यात यासाठी जिल्हा परिषद, पुणे यांच्या वतीने यंदा विशेष इ 'टॉयलेट सेवा' नावाचे मोबाइल ॲपची निर्मिती करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्या संकल्पनेतून साकारलेला हा उपक्रम स्वच्छतेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल मानला जात आहे. वारी मार्गावर विविध ठिकाणी फिरते शौचालय उपलब्ध करून देण्यात आली असून, त्यांची संख्या पुढीलप्रमाणे आहे. श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग १८०० शौचालये, श्री संत तुकाराम महाराज पालखी मार्ग १२०० शौचालये, श्री संत सोपान महाराज पालखी मार्ग ३०० शौचालये उभारण्यात आली आहे.




या शौचालयांच्या व्यवस्थापनासाठी विशेष मोबाइल ॲप तयार करण्यात आले असून, या ॲपमध्ये शौचालयाची उभारणी व स्थिती, स्वच्छतेची माहिती व नियमित वापर, शौचालयाच्या ठिकाणी असलेली पाणी, वीज, रस्ता व साफसफाईची माहिती, शौचालयाचा वापर किती झाला याचा तपशील, नागरिकांनी त्यांच्या प्रतिक्रिया व सूचना नोंदवण्याची सुविधा सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रत्येक शौचालयावर क्युआर कोड स्कॅनर लावण्यात आले असून गुगल स्कॅनर वापरून हा क्युआर कोड स्कॅन केल्यास संबंधित शौचालयाची माहिती मोबाइलवर तत्काळ मिळू शकते. ॲप गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध असून, भाविकांनी या ॲपचा वापर करून सुविधा व स्वच्छतेबाबत आपली मते नोंदवावीत, असे आवाहन जिल्हा परिषद प्रशासनाने केले आहे. जिल्हा परिषदेचा हा उपक्रम आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर करत वारकऱ्यांच्या सेवेत एक महत्त्वाची भर घालणार आहे. मोबाइलकरिता खालील प्रमाणे लिंक उपलब्ध करून दिलेल्या आहेत.

# सिंहगड रस्त्यावर वाहतूक कोंडीचे ग्रहण कायम

◆ पुणे (प्रतिनिधी) :





सिंहगड रस्त्यावर उड्डाणपूल उभारून ही वाहतूक कोंडीचे ग्रहण कायम आहे. सुटीच्या दिवशी सकाळपासूनच राजाराम पूल, विठ्ठलवाडी, हिंगणे खुर्द, वडगाव बुद्रुकपासून धायरी, नांदेड, किरकटवाडी फाटा आदी ठिकाणी प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. त्यामुळे पर्यटकांसह पारिसरातील नागरिकांचे हाल होत आहेत. सिंहगड रस्त्यावरील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्याच्या हेतूने धायरी फाटा येथील कै. रमेश वांजळे उड्डाणपूल व विठ्ठलवाडी ते फनटाइम थिएटर असे उड्डाणपूल उभारण्यात आले. मात्र, धायरी फाटा, हिंगणे खुर्द, विठ्ठलवाडी, माणिकबाग परिसरात होणारी मोठी कोंडी लक्षात घेता इथला कोंडीचा प्रश्न अद्याप सुटला नसल्याचे चित्र आहे.

गोयलगंगा चौक ते विठ्ठलवाडी यादरम्यानच्या पुण्याकडे जाणाऱ्या उड्डाणपुलाचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. शिवाय विठ्ठलवाडी ते फनटाइम थिएटर पुलामुळे वडगाव बुद्रुक येथील वीर बाजी पासलकर चौक (हायवे पुलाखाली) पिकअवर्समध्ये वाहनांच्या मोठ्या रांगा लागताना दिसतात.

प्रशासनाने धायरी फाटा ते पुणेकडे जाणाऱ्या मार्गावर वीर बाजी पासलकर चौकातील एक लेन वाहनांसाठी खुली केली आहे. मात्र, पुणे मार्गावरून सायंकाळच्या वेळेस येताना नोकरदार व आता शाळा सुरू झाल्याने स्कूल बस वाहतूक कोंडीत अडकत आहेत. पर्यायी रस्ता नसल्याने सिंहगड रस्त्यावरील वाहतूक वाढली आहे.



(छाया : अशोक घाग)

## केबलसाठी खोदलेले रस्ते कळवेकरांचे पाणी पळवताहेत

**ठाणे :** केबलसाठी खोदलेले रस्ते कळवेकरांचं पाणी पळवताहेत. कळव्यात सीसीटीव्ही कॅमेरा केबल टाकण्यासाठी रस्ते खोदले जात आहेत. त्यामुळे बऱ्याच ठिकाणी पाण्याच्या पाइपलाइन तुटल्या आहेत. कळवा मार्केट येथे खड्डा खणताना पाण्याची पाइपलाइन तोडण्यात आल्याने कळवेकरांचे पाणीच बंद होत आहे. त्यामुळे भर पावसात कळवेकरांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे.

# मुरबाडमध्ये मण्यार सापाचा वावर वाढला

नागरिकांना आरोग्य विभागाची खबरदारी घेण्याचे आवाहन

◆ **मुरबाड (प्रतिनिधी) :**



ठाणे जिल्ह्यातील विशेषतः मुरबाड तालुक्यातील ग्रामीण भागात तसेच आदिवासी पट्ट्यात व मुरबाड शहर परिसरात पावसाळा सुरू झाला की, अनेक ठिकाणी रात्रीच्या वेळेस निशाचर प्राण्यांचा वावर वाढतो. अशातच सर्वात विषारी मानला जाणारा सर्प म्हणजे मण्यार जातीचा आहे. पावसाळ्यामध्ये पाणी शिरून सर्प बसण्याची जागा पाण्याने भरल्याने सर्प हे मानवी वस्तीमध्ये म्हणजेच घरामध्ये अथवा ज्या ठिकाणी त्यांना राहण्यासाठी सुरक्षित जागा मिळेल अशा ठिकाणी असे विषारी सर्प आपला निवारा शोधतात. अशाच प्रकारे मुरबाड तालुक्यात अनेक ठिकाणी मण्यार सर्पदंशाने लोक दगावले आहेत. म्हणून खबरदारी घेण्याचे आवाहन आरोग्य विभागाकडून केले आहे.

मण्यार सर्प हा काही ठिकाणी कंडोर, कांडोरा, मण्यार असे बोलले जाते. मुरबाड तालुक्यामध्ये अनेक ठिकाणी मण्यार जातीचा सर्प मोठ्या प्रमाणात आढळतो. या सर्पाचे वैशिष्ट्य म्हणजे या सर्पाचे डोके लहान असून तोंड चपटे असते व हा काळसर रंगाचा असून त्याच्या अंगावरती सफेद रंगाच्या पट्टे असतात. हा सर्प निशाचर मधला खरोखरच असल्याचा पुरावा म्हणजे हा रात्रीचा शिकारीवर निघत असतो. त्याचे शिकार म्हणजे छोटे बेडूक, उंदीर, किडे, पाली, सरडे असे असते यामुळे तो लोक वस्तीमध्ये लोकांच्या घरांमध्ये जास्त प्रमाणात आढळतो. हा रात्रीच्या वेळेस त्याचे भक्ष शोधत असताना उष्णतेचे ठिकाण म्हणून अनेकांच्या अंथरुणात घुसून बसतो. माणसाची हालचाल झाल्यास त्याच्या नरम अथवा चपट्या भागाला तो दंश करतो. त्याचे कारण त्याचे तोंड चपटे व लहान असते त्यामुळे तो कानाची बाळी बोटांच्या फटीमध्ये पायांच्या बोटांच्या फटीमध्ये वा टाचेच्या वरच्या भागाला जास्त प्रमाणात चावण्याच्या खुणा आढळतात. हा मन्यार सर्प चावताना त्याचा दंश समजून येत नाही त्यामुळे त्याचे विष काही काळानंतर झोपेतच माणसाच्या शरीरात पसरते व मेंदूला मज्जातंतूला बाधित करते व श्वसन घेण्यास त्रास झाल्याने माणसाचे शरीर मृत करतो हा मण्यार सर्प नाग-कोब्रा अशा जातींच्या सर्पांपेक्षा याच्या विषयाचे प्रमाण अधिक व जहाल असते. मण्यार सर्प लहान असो वा मोठा याचे विषाचे प्रमाण १००% घातक असते.

मण्यार सर्पाचे दात अतिशय बारीक व तीक्ष्ण असल्याने तो दंश करताना समजून येत नाही व दंश झालेली जागा देखील लवकर समजून येत नाही व मनुष्य झोपेत असताना अशा प्रकारे मण्यार सर्प हा जास्त प्रमाणात दंश करतो. मण्यार सर्पाच्या राहण्याची जागा ह्या अडगळीच्या ठिकाणी दरवाजाच्या फटीत, खिडकीच्या फटीत, विटांच्या फटीमध्ये व बारीकशा बारीक जागेमध्ये मण्यार सर्प राहू शकतो व तो दिवसा जास्त दिसून येत नसून निशाचर असल्याने हा रात्रीच बाहेर पडतो. मण्यार सर्प फक्त घरातील एका मनुष्याला चावून थांबत नाही, तर आजूबाजूच्या देखील मनुष्यांना चाऊ शकतो. एवढा हा घातक व विषारी रागीट सर्प आहे. त्यामुळे याच्यापासून लांब राहणे व सावधान राहणे हेच योग्य आहे. जर आपल्याला कोणाला चावला असे समजले असेल तर ताबडतोब आरोग्य विभागाशी व दवाखान्यात जाऊन संपर्क साधावा. त्याचा इलाज हा दवाखान्यातच होईल तसेच जर समजून आल्यास दंश झालेल्या जागेच्या वरच्या बाजूस कापडी दोरीने घट्ट आवळून बांधावे तसेच कोणताही सर्प चावल्यास आपण जवळच्या दवाखान्यात दाखल व्हावे असे टोकावडे प्राथमिक आरोग्य केंद्राचे अधीक्षक वैद्यकीय अधिकारी नितीन मोकाशी यांनी केले आहे.

> मी आतापर्यंत मुरबाड तालुक्यासह इतर ठिकाणी अनेक विषारी, बिनविषारी सर्प पकडून त्यांना वन विभागाच्या जंगलामध्ये सोडलेले आहे. मण्यार सर्प हा खरोखरच सर्वात जास्त विषारी व चप्पळ तसेच घातक आहे. याचा चावा सहज समजून येत नाही. याच्यापासून हवा तेवढा आपला बचाव करणे हेच योग्य आहे.
> **- अनिल सकट**, सर्पमित्र

भिवंडी नपा प्रशासनाकडून दिले आदेश

# बेकायदा शाळांचे वीज, पाणी कनेक्शन तोडणार




◆ **भिवंडी (प्रतिनिधी) :**

भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात परवानगीशिवाय चालणाऱ्या बेकायदेशीर शाळांवर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. भिवंडीतील बेकायदा शाळांविरोधातील कारवाईची मागणी पीपल्स रिपब्लिकन पक्षाने केली असून आंदोलनाचा इशारा दिला होता. अखेर याची दखल घेत मनपा प्रशासनाने बेकायदा शाळांचे वीज आणि पाणी जोडणी खंडीत करण्याचे आदेश दिले आहेत.

महानगरपालिका प्रशासनाने घोषित केलेल्या १८ बेकायदेशीर शाळांव्यतिरिक्त आणखी ५ अनधिकृत शाळांची यादी देऊन परवानगीशिवाय चालणाऱ्या सर्व शाळांवर कारवाई करण्याची मागणी पीपल्स रिपब्लिकन पक्षाने केली आहे. १५ दिवसांत बेकायदेशीर शाळांवर कारवाई न केल्यास, पक्ष महानगरपालिका मुख्यालयासमोर आंदोलन करणार असा इशाराही त्यांनी महानगरपालिका प्रशासनाला दिला आहे. याची दाखल घेत पालिकेने अवैध शाळांचे पाणी आणि वीज खंडित करण्याचे आदेश संबंधित विभागास दिले आहेत.

शिक्षण विभाग, महाराष्ट्र आणि भिवंडी महानगरपालिका आयुक्तांना निवेदन देऊन शहरात चालणाऱ्या अनधिकृत शाळा आणि महाविद्यालयांवर दंडात्मक कारवाई करण्याची मागणी पीपल्स रिपब्लिकन पार्टी मायनॉरिटी विभागाचे भिवंडी शहर अध्यक्ष अब्दुल गनी खान यांनी केली आहे. त्यांनी निवेदनात म्हटले आहे की, महानगरपालिका प्रशासनाने काही महिन्यांपूर्वी शहरात सुरू असलेल्या १८ बेकायदेशीर शाळांची यादी जाहीर केली होती. तरी देखील शहरात बेकायदेशीर शाळा सुरू आहेत.

या शाळांमुळे सरकारी शाळा बंद होत आहेत. या अनधिकृत शाळांना संरक्षण देणाऱ्या अधिकाऱ्यांवर आणि या शाळा चालवणाऱ्यांवर कठोर आणि दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी आहे. तसेच या अनधिकृत शाळांमुळे विद्यार्थ्यांचे भविष्य उद्धस्त होत असल्याचा आरोप देखील त्यांनी केला आहे. या शाळांवर कारवाई न झाल्याने अनधिकृत शाळांमध्ये प्रवेश घेतल्याने अनेक विद्यार्थ्यांची फसवणूक होत आहे.

शिक्षण विभागाने बेकायदेशीरपणे चालणाऱ्या अर्धा डझनहून अधिक बेकायदेशीर शाळांची नावे यादीत समाविष्ट केलेली नाहीत. त्यामुळे या निवेदनात महापालिकेच्या यादीत समाविष्ट नसलेल्या ६ बेकायदेशीर शाळांची यादी देखील जोडली आहे.

> महापालिकेने बेकायदेशीर शाळांबाहेर शाळा अनधिकृत असल्याचे बॅनर लावले जाईल. ज्यामध्ये पालकांना त्यांच्या मुलांना बेकायदेशीर शाळांमध्ये प्रवेश देऊ नये अशी विनंती केली जाईल. यासोबतच लवकरच बेकायदेशीर शाळांवर गुन्हा दाखल केला जाईल. ज्याची प्रक्रिया सध्या सुरू झाली आहे.
> **- बाळकृष्ण क्षीरसागर,** महापालिका शिक्षण विभाग उपायुक्त

## वेचक

### विद्यार्थ्यांना 'पेपरट्रॉनिक किट'चे वाटप




**मुरबाड :** मुरबाड तालुक्यातील कोरावळे, येथे जिल्हा परिषद शाळा कोरावळे येथे एक महत्त्वपूर्ण शैक्षणिक उपक्रम पार पडला. ७ वी व ८वीच्या ६५ विद्यार्थ्यांना 'पेपरट्रॉनिक किट'चे वाटप करण्यात आले. हा अभिनव उपक्रम अगस्त्य इंटरनॅशनल फाउंडेशन आणि सोसायटी जनरल सिक्युरिटीज सर्व्हिसेस यांच्या संयुक्त विद्यमाने राबवण्यात आला. शाळेचे मुख्याध्यापक मंगळदास कंटे आणि इतर शिक्षकांच्या उपस्थितीत हे किट वाटप करण्यात आले. यावेळी केवळ किटचे वाटपच झाले नाही, तर त्यातील साहित्य आणि त्याद्वारे करता येणाऱ्या विविध ॲक्टिव्हिटींबद्दल या संस्थेच्या स्वयंसेविका रिंकू पडवळ व तेजस्विनी माळी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती देण्यात आली. विशेष म्हणजे, मुलांकडून लगेचच एक प्रात्यक्षिक ॲक्टिव्हिटी करून घेण्यात आली, ज्यात विद्यार्थ्यांनी प्रचंड उत्साह आणि उत्सुकता दाखवत ती यशस्वीरित्या पूर्ण केली. 'पेपरट्रॉनिक किट'मुळे मुलांना विज्ञानातील संकल्पना अधिक सोप्या आणि मनोरंजक पद्धतीने समजण्यास मदत होईल, ज्यामुळे त्यांची वैज्ञानिक जिज्ञासा वाढेल.

### महिलांसाठी कौशल्यवृद्धी कार्यशाळा



**भाईंदर :** महिलांना उद्योजकतेसाठी प्रेरणा देऊन आर्थिक दृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी मीरा-भाईंदर महापालिकेच्या वतीने महिला कौशल्यवृद्धी कार्यशाळा कार्यक्रमाचे नीती आयोग आणि महिला उद्योजक मंच यांच्या सहकार्याने आयोजन करण्यात आले होते. मीरा-भाईंदर महापालिकेच्या मुख्यालयात महिला कौशल्यवृद्धी कार्यशाळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महिलांना उद्योग करताना आर्थिक साक्षरता म्हणजे पैशाचे योग्य व्यवस्थापन करण्याचे ज्ञान आणि कौशल्याचे प्रशिक्षण, व्यवसाय वृद्धीसाठी दिशा आणि आर्थिक साक्षरतेचा लाभ मिळावा या हेतूने विविध तज्ञ संस्थांनी मार्गदर्शन सत्र घेतले. फराळ सखी या महापालिकेच्या यशस्वी उपक्रमातील महिलांनीही विशेष सहभाग नोंदवला होता. महापालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली व शहर अभियंता दिपक खांबीत यांच्या उपस्थितीत झालेल्या या उपक्रमाला महिला वर्गाचा उत्स्फूर्द प्रतिसाद लाभला होता. महिलांचा आर्थिक, सामाजिक सशक्तीकरण हा राष्ट्राच्या प्रगतीचा पाया आहे. फराळ सखी सारख्या नवकल्पनांनी युक्त उपक्रमांची मालिका भविष्यात राबवली जाणार असल्याचे आयुक्त राधाबिनोद शर्मा यांनी सांगितले.

### 'तालुक्यातील आरोग्य सुविधा सुरळीत करा'



**मुरबाड :** तालुक्यातील आरोग्य व्यवस्था अत्यंत दयनीय अवस्थेत सुरू आहे. याचा प्रत्यय मुरबाड तालुक्यात अनेकवेळा दिसून आला काही दिवसांपूर्वीच मुरबाड तालुक्यातील आदिवासी बांधवांचा सर्प दंशाने मृत्यू झाला. तसेच आता पावसाळ्याचे दिवस सुरू असल्याने मुरबाड तालुक्यातील ग्रामीण भागात व विशेष करून आदिवासी वस्ती वाड्यांमध्ये आरोग्य विषयक समस्या निर्माण होऊ शकतात. या अनुषंगाने मुरबाड तालुक्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र मधील आरोग्य सेवा सुरळीत सुरू करून तेथे योग्य तो औषध साठा उपलब्ध करून द्यावा यासाठी आज महाराष्ट्र नवनिर्माण मुरबाड शहर शिष्टमंडळाने तालुका आरोग्य अधिकारी श्रीधर बनसोडे यांची भेट घेऊन निवेदन दिले व आरोग्य व्यवस्था व तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांची औषध साठा तसेच सर्पदंश यावर औषध उपलब्ध करण्यासाठी चर्चा केली. यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे मुरबाड शहराध्यक्ष देवेंद्र जाधव, शहरसंघटक कीर्ती गोहिल यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

## शिवसह्याद्री प्रतिष्ठानच्या वतीने विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**कल्याण :** शिव सह्याद्री प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य कल्याण विभाग या माध्यमातून सामाजिक बांधिलकीचा वसा जोपासला जात असून, पिसवली येथे विद्यार्थ्यांना वह्या वाटप व विद्यार्थी गुणगौरव समारंभ नुकताच पार पडला. समाजातील आर्थिक, दुर्बल, गरीब व गरजू अशा अनेक विद्यार्थ्यांना मदतीचा हात देत सर्व पदाधिकारी यांच्या उपस्थितीमध्ये गुण गौरव सोहळा पार पडला. यावेळी विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी साहित्यांचे वाटप करण्यात आले.

## डम्पिंग ग्राऊंडच्या जागेचे होणार बगीच्यात रूपांतर

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

पिसवली परिसरातील नागरिकांची डम्पिंगच्या दुर्गंधीपासून मुक्तता होणार असून पिसवली देशमुख होम्स परिसरातील कचरा हटविण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून ग्रामस्थ मागणी करत होते. ग्रामस्थांची मागणी लक्षात घेऊन डम्पिंग ग्राउंडच्या जागेचे बगीच्यात रूपांतरण करण्यासाठी आमदार राजेश मोरे यांनी पुढाकार घेतला आहे.



रस्त्याच्या कडेला सातत्याने कचरा फेकला जात असल्याने पिसवली आणि देशमुख होम्स दरम्यानच्या सुंदर जागेचे भराव भूमीत रूपांतर होत असल्याची बाब कळताच कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांनी तत्काळ या जागेची पाहणी करत वन विभागाच्या अधिकार्यांना सूचना दिल्या. यानंतर हा परिसर स्वखर्चाने स्वच्छ करणार असल्याचे जाहीर केले. तसेच भविष्यात या जागेचे पुन्हा कचरा कुंडीत रूपांतर होऊ नये यासाठी या ठिकाणी वृक्षारोपण करत या परिसराचे सौंदर्यीकरण करण्याचे आश्वासन आ. मोरे यांनी दिले. तसेच या भूखंडालगत असलेल्या स्मशानभूमीत देखील नागरिकाच्या सोयीसाठी बाकडी बसवून या स्मशानभूमीच्या परिसराचे सुशोभीकरण करणार असल्याचे त्यांनी सांगितले. कल्याण ग्रामीण मतदार संघात येणार्या पिसवली.

## 'जनसेवकाचा जनसंवाद' नागरिकांसाठी हक्काचा उपक्रम

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

ठाण्याचे जनसेवक, आमदार संजय केळकर यांच्या "जनसेवकाचा जनसंवाद" हा उपक्रम ठाण्यापुरता मर्यादित न राहता मुलुंड, घाटकोपर, दादर, बदलापूर, दिवा, डोंबिवली, कल्याण, पनवेल, खोपोली पर्यंत याची ख्याती पोहचली आहे. या उपक्रमात नागरिकांच्या समस्यांचे निरसन होत असल्याने दर सोमवारी आणि शुक्रवारी मोठ्या संख्येने नागरिक आपल्या समस्या, अडचणी, गाऱ्हाणी घेऊन आ. संजय केळकर यांना भेटण्यासाठी येत आहेत. या उपक्रमातही शेकडो नागरिकांनी आपल्या तक्रारी आ. केळकर यांच्या समोर मांडल्या. परांजपे स्किममध्ये फसवणूक झालेल्या सदस्यांनी आ. केळकर यांची भेट घेतली. तसेच अनेक विषय आ. केळकर यांच्यासमोर मांडण्यात आले. त्यातील काही विषय आ. केळकर यांनी तिथेच सोडविले.

## कल्याणच्या स्कायवॉकवर घाणीचे साम्राज्य

◆ **डोंबिवली (प्रतिनिधी) :**

कल्याण पूर्वेकडे असलेल्या सिद्धार्थ नगरकडून रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या स्कायवॉकवर घाणीचे साम्राज्य पसरले आहे. यामुळे रेल्वे प्रवाशांमधून तीव्र नाराजी व्यक्त आहे. दरम्यान जागरूक नेटकऱ्यांनी स्कायवॉकवर पसरलेल्या घाणीच्या साम्राज्याचा व्हीडियो समाज माध्यमांवर प्रसारित केला आहे. कल्याण-डोंबिवली महानगरपालिका आणि रेल्वे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने स्कायवॉकवर कचऱ्याचे साम्राज्य पसरल्याचे दिसून येत आहे.



या स्कायवॉकवरून पश्चिमेकडून पूर्वेकडे जाणारे पादचारी, रेल्वे प्रवासी, बाजारहाट करण्यासाठी ये-जा करणाऱ्या गृहिणींना नाक मुठीत धरून चालावे लागते. चोहोबाजूंनी थुंकलेल्या भिंती, कोपऱ्या-कोपऱ्यात कचऱ्याचे ढीग, दुर्गंधी आणि प्रचंड घाण, याचा त्रास प्रवाशांना सहन करावा लागतो. स्वच्छ भारत अभियानाची खिल्ली उडविणाऱ्या या स्कायवॉककडे सपशेल दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे. महापालिकेला स्वच्छता कर, तर रेल्वे प्रशासनाला प्रवासाचे शुल्क भरूनही कुणालाही स्वच्छतेची जबाबदारी घ्यायची नाही. नेहमीप्रमाणे या भागाची जबाबदारी झटकणाऱ्या संस्था एकमेकांकडे बोट दाखवणार आणि जनतेच्या सहनशीलतेचा फायदा घेत मोकळ्या होणार. दरम्यान प्रशासन जर हात झटकून मोकळे होणार असेल, तर करसंकलन बंद करावे आणि नागरिकांनी स्वतः झाडू घेऊन स्वच्छता करावी का? असा सवाल रेल्वे प्रवाशांकडून उपस्थित करण्यात येत आहे.

## देहविक्री करणाऱ्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणार

महानगरपालिकेचा एका हात रोजगार मदतीचा

◆ **भिवंडी (प्रतिनिधी) :**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या समाज कल्याण विभागाच्या महिला बाल कल्याण योजनेंतर्गत देह विक्री करणाऱ्या महिला / मुली यांना त्या क्षेत्रातून पुर्णतः बाहेर पडून सक्षम होणेकरिता त्यांना रोजगार उपलब्ध करुन, त्यांच्या पुर्नवसनाची योजना आखण्यात आली होती. या योजनेंगर्त या महिलांना भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे प्रशासक तथा आयुक्त अनमोल सागर यांच्या हस्ते दिव्याकरिता आवश्यक असणाऱ्या फुलवाती बनविणाऱ्या मशिनचे वाटप करण्यात आले.



भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील हनुमान टेकडी परिसरात देहविक्री करणाऱ्या महिलांचा परिवर्तन महिला बचत गट, खदान रोड, हनुमान टेकडी, भिवंडी यांना त्यांच्या विनंतीनुसार महानगरपालिकेने ८ फुलवाती बनविणाऱ्या मशीन पुरविल्या आहेत. या मशीनमुळे या सर्व महिलांना हक्काचा रोजगार उपलब्ध होऊन त्या स्वावलंबी होऊ शकतील. आता सुरू होणारे सणवार, उत्सव या कालावधीमध्ये दिव्याच्या फुलवातींना मोठ्या प्रमाणात मागणी असते. त्यामुळे या महिलांना चांगल्या प्रकारे रोजगार प्राप्त होऊन त्यांना आर्थीक लाभ देखील मिळू शकतो. या महिलांचा बचत गट हा श्री साई सेवा संस्था या संघटनेच्या मार्गदर्शनाखाली काम करुन फुलवातींचे उत्पादन करणार आहे. या महिलांकडून उत्पादन केलेल्या फुलवातींची खरेदी शहरातील नागरीकांनी करुन त्यांच्या कार्यास हातभार लावावा अशी अपेक्षा श्री साई सेवा संस्थेच्या अध्यक्षा डॉ. स्वाती सिंग यांनी केली. तसेच, मा. प्रशासक तथा आयुक्त अनमोल सागर यांनीदेखील अशाच प्रकारचा विश्वास व्यक्त करुन या बचत गटांना मशिनचे वाटप केले आणि शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी अतिरीक्त आयुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त (समाज कल्याण) विक्रम दराडे, सहायक आयुक्त (समाज कल्याण) शैलेश दोंदे, श्री साई सेवा संस्थेच्या अध्यक्षा डॉ. स्वाती सिंग, परिवर्तन महिला बचत गटाच्या सदस्य आणि समाज कल्याण विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## पूरसदृश परिस्थितीला जबाबदार कंत्रादारावर कारवाईची मागणी

◆ **भाईंदर (वार्ताहर) :**

मीरा-भाईंदर शहरातील मान्सूनपूर्व नाले सफाई कंत्रादारावर निष्काळजीपणाचा ठपका ठेवत दंडात्मक कारवाई करण्यात आल्यावर त्याला पुढील कामात कसुरता आढळल्यास कडक कारवाई करण्याचा इशारा दिला होता, त्यानंतरही पहिल्याच पावसात शहरात पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याने महापालिकेने आता त्याला काळ्या यादीत टाकून काम समाधानपूर्वक पूर्ण होईपर्यंत त्याची देय रक्कम देऊ नये अशी मागणी करण्यात आली आहे.

शहरातील नाले सफाईचे कंत्राट देण्यात आले होते. मान्सूनपूर्व नाले सफाईचे काम २० एप्रिल २०२५ सुरू करण्यात आले. त्यानंतर २० मे



२०२५ रोजी आयुक्त राधाबिनोद शर्मा यांनी अधिकाऱ्यांसमवेत शहरातील महाजन वाडी, पेणकर पाडा, सृष्टी परिसर, अयप्पा मंदिर जवळील नाला इत्यादी ठिकाणी निरीक्षण केले. पाहणीत नालेसफाईच्या कामात अपेक्षित गुणवत्ता व कार्यक्षमता दिसून आली नाही. कामातील या त्रुटीमुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो, यामुळे आयुक्तांनी कंत्राटदाराच्या पहिल्या देयक रकमेतून १०% दंड आकारला होता. तसेच भविष्यात कामांमध्ये कोणतीही उणीव आढळल्यास अधिक कठोर कारवाई करण्यात येईल अशी ताकीद दिली होती. त्यानंतरही कामात अपेक्षित सुधारणा व गुणवत्ता न केल्यामुळे पहिल्याच पावसात शहरात पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याने याला कारणीभूत कंत्रादाराला महापालिकेने आता काळया यादीत टाकून काम समाधानपूर्वक पूर्ण होईपर्यंत त्याची देय रक्कम देण्यात येऊ नये अशी मागणी आयुक्तांकडे केली आहे.

जिल्हा कृषी विभागाकडून ८० क्विंटल बियाणांचा पुरवठा

## ठाणे जिल्ह्यातील पेरण्या अंतिम टप्प्यात

◆ **ठाणे (वार्ताहर) :**

पावसाने चांगलाच जोर धरला असल्याने शेतकरी सुखावला असून पेरण्या अंतिम टप्प्यात आहेत. ठाणे जिल्ह्याचे नागरीकरण अधिक झाले असले तरी जिल्ह्यात ५४ हजार २३१ हेक्टरवर शेतीची लागवड होणार असून त्यासाठी ३३९२ हेक्टरवर पेरणी होऊन रोपांची लागवड करण्यात आली आहे. त्याकरिता जिल्हा अधीक्षक आणि ठाणे जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडून ५० टक्के अनुदानावर ९२२ क्विंटल बियाणांचा पुरवठा शेतकर्यांना झाल्याची माहिती जिल्हा



अधीक्षक कृषी अधिकारी रामशेर पांचे यांनी दिली.

ठाणे जिल्ह्यात भात व नाचणीची लागवड होते. जिल्ह्यात शेतीचे प्रमाण कमी होत असून नागरीकरणाकडे अधिक भर दिला जात आहे. मुरबाड, शहापूर, भिवंडी तालुक्यात मोठ्या प्रमाणावर भात शेती व नाचणी होते. कल्याण, अंबरनाथ तालुक्यातील काही भागात शेती केली जाते. ठाणे तालुक्यात काही भागात शेतकरी पारंपरिक पद्धतीने शेती करताना दिसतात. त्यामुळे ठाणे जिल्ह्यातील ५४ हजार २३१ हे. जमिनीवर भात लागवड केली जाते. त्यासाठी ३,३९२ हेक्टरवर भाताचे रोप तयार करण्यासाठी पेरणी झाली आहे. या पेरणीसाठी शेतकर्यांना ५० टक्के अनुदानावर बियाणांचा पुरवठा केला जातो. महाबीजकडून हे बियाणे पुरविले जाते. यावर्षी रत्नागिरी ८ या जातीच्या बियाणांसह रत्नागिरी ६ जातीची बियाणी पुरवण्यात आली. रत्नागिरी ६ जातीच्या बियाणातून बारीक तांदूळ मिळतो. त्याची मागणी शेतकर्यांकडून झाली आहे. त्यानुसार २४ क्विंटल बियाणी उपलब्ध करून दिली आहेत.

जिल्हा कृषी विभागाकडून ८० क्विंटल बियाणांचा पुरवठा करण्यात आला असून ८ क्विंटल नाचणी बियाणे अनुदानावर गटांना देण्यात आले आहे. तर ठाणे जिल्हा परिषेदेकडून ८४२ क्विंटल बियाणांचा पुरवठा करण्यात आलेला आहे.

बियाणांबरोबर ठाणे जिल्ह्यासाठी ४ हजार ५९३ मॅट्रिक टन खत उपलब्ध झाले असून त्यापैकी २ हजार ६२३ मॅट्रिक टनांची विक्री झाली आहे. सुमारे १,९७० खत शिल्लक आहे. सप्टेंबरपर्यंत खताची मागणी होत असल्याने जिल्ह्यात मुबलक खत उपलब्ध झाले असल्याचे कृषी अधिकारी पाचे यांनी सांगितले.

## खचलेल्या रस्त्याचे काम नियमानुसार नसल्याचे मनपाला एमएमआरडीएचे पत्र

◆ **भाईंदर (वार्ताहर) :**

भाईंदर पूर्वेकडील इंद्रलोक भागातील रस्ता खचून झालेल्या दुर्घटनेला जबाबदार असलेल्या बिल्डरवर गुन्हा दाखल करण्याचा निर्णय घेऊनही महापालिकेने दुर्लक्षित केल्यावर त्या रस्त्याचे बिल्डरने हाती घेतलेले दुरुस्तीचे काम एमएमआरडीएच्या अभियंत्यांनी पाहणी केल्यावर नियमानुसार होत नसल्याचे आढळून आल्याचे पत्र महापालिकेला दिले आहे.

भाईंदर पूर्वेकडील इंद्रलोक भागातील तपोवन शाळे जवळच्या सीसी रस्त्याचे काम काही महिन्यांपूर्वी एमएमआरडीएकडून करण्यात आले होते. याच रस्त्यालगत आरएनए बिल्डरच्या गृहप्रकल्पाचे काम सुरु करण्यात आले, या इमारतीच्या पोडियमसाठी खोदकाम करताना बिल्डरने रस्त्याखालील जमीन खचणार नाही, यासाठी कोणतीही खबरदारी घेतली नाही. परिणामी १७ मे रोजी या रस्त्याखालची जमीन खचल्याची घटना घडली होती. एमएमआरडीएने त्या रस्त्याच्या दुरुस्तीची जबाबदारी बिल्डरवर निश्चित केली होती. तसे पत्र एमएमआरडीएने पालिकेला १९ मे रोजी पाठविले. यानंतरही बिल्डरने त्या रस्त्याच्या दुरुस्तीला सुरुवात केली नाही. अलिकडेच बिल्डरने रस्त्याच्च्या दुरुस्तीचे काम हाती घेतले असले तरी ते नियमानुसार केले जात नसल्याचे एमएमआरडीएच्या निदर्शनास आले. त्यांनी त्या कामाचा आढावा घेत पालिकेला ११ जून रोजी पत्र पाठवून त्या रस्त्याची होत असलेली दुरुस्ती निकृष्ट दर्जाची असून भविष्यात होणाऱ्या नुकसानीला बिल्डरच जबाबदार असल्याचे स्पष्ट केले. तसेच बिल्डरने त्याच्या जागेत खोदकाम करताना कोणतीही सुरक्षा वा उपाययोजना केली नसल्यानेच निष्काळजीपणामुळे रस्त्याखालची जमीन खचल्याचे एमएमआरडीएने या पत्रात नमूद केले आहे.

# कोलाज



# निसर्गवाचक हरपला...

**किरण पुरंदरे**
**प्रसिद्ध निसर्ग अभ्यासक**

अरण्यऋषी, वन्यजीव अभ्यासक पद्मश्री मारुती चितमपल्ली म्हणजे निसर्गातील ठेवा समाजाला कळावा यासाठी सतत कार्यरत राहणारा सकारात्मक विचारांचा ऊर्जाकोशच. त्यांनी पक्षीकोश, प्राणिकोश आणि मत्स्यकोशाचे लेखन केले. त्यांनी वन्यजीव अभ्यासक म्हणून मोठे कार्य केलेच, त्यासोबत मराठीलादेखील मोठे योगदान दिले. असा प्रसिद्ध पक्षीतज्ज्ञ आणि वृक्ष अभ्यासक आपल्यातून जाणे ही मोठी हानी म्हणावी लागेल.

मारुतीराव गेले... त्यांनी पक्षी, प्राणी, झाडे, वाळव्या अशा सगळ्या विषयांवरच भरपूर लिहिले. निसर्गातील कोणताही विषय त्यांनी वर्ज्य ठेवला नाही. अनेकांच्या वाचनात बाळपावलांच्या, संस्कारक्षम वयातच मारुतीरावांचे हे लिखाण आल्यामुळे भारावून टाकणारे वातावरण निर्माण झाले, यात शंका नाही. यांच्या लिखाणातून निसर्ग किती मोठा तसेच रंजक आहे, हे अनेकांना समजले. आयुष्यातील खूप मोठा काळ निसर्गाशी रममाण होण्यात, तो समजून घेण्यात घालवलेले आणि अलीकडेच 'पद्मश्री' पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले 'अरण्यऋषी' मारुती चितमपल्ली यांच्या निधनाची बातमी अस्वस्थ करणारी आहे. असंख्य लोकांना, काही पिढ्यांना निसर्गाचे अक्षरशः वेड लावणारे हे नाव आता काळाच्या उदरात गडप झाले आहे. त्यांनी आपल्या अनुभव संपन्न लिखाणाद्वारे, निरीक्षणांद्वारे लोकांच्या मनात उत्सुकताच निर्माण केली नाही, तर तो किती सुंदर आहे हे दाखवून दिले. हे निसर्गाबरोबरच स्थानिक लोकांशी नाळ जोडणारे व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील हे एक वेगळेपण म्हणावे लागेल. बरेचदा लोक स्वतंत्रपणे लिखाण करतात. त्यात त्या व्यक्तीच्या मनोगताला महत्त्वाची जागा असते. पण मारुती चितमपल्ली यांची नाळ निसर्गाबरोबरच स्थानिक वाटाडे, रहिवासी, आदिवासी, मजूर अशा अनेकांशी घट्ट जुळली होती. परिणामस्वरूप त्यांच्या लेखनामध्ये निसर्गातील रमणीयतेबरोबरच त्यांचेही अस्सल संदर्भ आले. ते तपासून पाहणे आदी गोष्टी पुढच्या आहेत. पण मुळात या शैलीमुळे त्यांच्या लेखनामध्ये, कामामध्ये एक प्रकारचा जिवंतपणा आला.

आयुष्यभर निसर्गपूजक राहिलेल्या या व्यक्तीने लिहिलेल्या पुस्तकांमधून आपल्याला अनेक कथा वाचायला मिळतात. लिखाण करत असताना त्यांना भावलेले अनेक नवीन शब्द आपल्या लिखाणात आवर्जून आणले. अर्थात ते शब्द पूर्वी अस्तित्वात नव्हते अशातला भाग नाही. झाडीबोलीमध्ये ते शब्द होतेच. पण मारुतीरावांनी हे शब्द आपल्या लेखनामध्ये आणले आणि सर्वसामान्यांना त्यांचा परिचय घडवला. त्यांनी ईशान्य महाराष्ट्रातील, विदर्भातील निसर्गाचा ठेवा मोठ्या जनसमुदायापर्यंत पोहोचवण्याचे काम इतक्या प्रभावी पद्धतीने केले की, हे करता करता जणू काही तेच या दोहोंमधला सेतू झाले. त्यांची निरीक्षणे अनेकांना अभ्यासास प्रवृत्त करणारी होती. अशा प्रकारे निसर्ग दीर्घकाळ जवळून बघणारा, त्यावर प्रेम करणारा, त्याच्याशी एकरूप होणारा आणि एकेक आविष्कार अनुभवत एक प्रकारे त्याला शरण जाणारा माणूस असेच त्यांचे वर्णन करावे लागेल. एकदा अशी समरसता साधली की, निसर्गदेखील पाठीवर कौतुकाची थाप देतो. हे भाग्य मारुतीरावांना लाभले होते, असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही.

मारुतीरावांनी लिखाणामधून आपले अनुभव मांडले. लोकांनी पुस्तकांमधील शब्द वाचले, पण त्याव्यतिरिक्त त्यांनी सांगितलेले सगळ्यांनाच समजले असेल असे नाही. पाडगावकरांनी लिहिल्याप्रमाणे 'शब्दावाचून कळले सारे, शब्दांच्या पलीकडले...' असे बरेच काही त्यांच्या लिखाणात होते. अर्थातच खऱ्या अर्थी निसर्गाशी एकरूप झालेल्यांना, निसर्गाच्या संवेदना समजणाऱ्या लोकांनाच अशा गोष्टी दिसतात, समजतात. संवेदनांचे मीलन झाल्याखेरीज शब्दांपलीकडच्या जागा सापडणे कठीण असते. कारण चितमपल्लींसारखी व्यक्ती लिहिते, एखादी गोष्ट सांगते तेव्हा त्याच्या आत लपलेले बरेच काही शोधून काढणे सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेरचे आहे, असे वाटते. म्हणूनच कदाचित जी. ए. कुलकर्णी यांनी 'त्यांच्या पावलांना रानवाटांची माहेरओढ आहे' असे म्हटले असावे.

मारुती चितमपल्ली निसर्ग, झाडापानांमध्ये, पशूपक्ष्यांमध्येच रमले. हे रमणे त्यांनी शब्दबद्ध केले. चांगली गोष्ट म्हणजे माझ्यासारख्या अनेकांच्या घडत्या वयामध्ये त्यांचे लेखन वाचायला मिळाले आणि एका वेगळ्या जगाबद्दल जाणून घेण्याची ऊर्मी बळावली. त्यांच्या कथा वाचताना गुंतून पडायला होते. वाचक त्यात अडकतो. त्यांच्या निरीक्षणांना शास्त्राची साथ आहे का, हे वा यासारखे मुद्दे तूर्तास बाजूला ठेवू या. या वादात आता पडायला नको. पण त्यांचे वाचकांपुढे मांडणेदेखील अत्यंत महत्त्वाचे होते कारण तरुण पिढीसमोर अशा प्रकारच्या निरीक्षणांची मांडणी केल्यामुळे समोर एक आव्हान उभे राहिले हे नक्की. त्यातूनच असे खरेच होते का... हे पडताळून बघण्यासाठी अनेकांची पावले निसर्गाकडे वळली. त्यांनी एक प्रकारे अनेकांच्या मेंदूला, विचारांना खुराक पुरवला. मुख्य म्हणजे आपली निरीक्षणे तपासून बघण्यासाठी त्यांनी अनेकांशी पत्रव्यवहारही केला. याविषयी आम्ही दोघेही बोलायचो. उदाहरणार्थ, कावळे कोणत्या झाडाच्या कोणत्या भागात घरटी करतात यावरून एखाद्या वर्षी किती पाऊस पडणार आहे, असा विषय आमच्या चर्चांमध्ये असायचा. जिज्ञासा आणि उत्सुकतेपोटी मारुतीरावांनी पुन्हा पुन्हा असे अनेक विषय हाती घेतले आणि त्यावर अभ्यास केला. चतन केले. अभ्यासक असण्याबरोबरच एक रसिक म्हणून त्यांनी या क्षेत्रात मुशाफिरी केली. त्यामुळेच ते अनेक विषय हाताळू शकले, असे म्हणता येईल.

निसर्गाचा पट खूप मोठा आहे. विशाल आहे. याचे भान राखत त्यांनी पक्षी, प्राणी, झाडे, वाळव्या यांच्यावर लिहिले. आदिवासींवर लिहिले. म्हणजेच निसर्गातील कोणताही विषय त्यांनी वर्ज्य ठेवला नाही. अनेकांच्या वाचनात बाळपावलांच्या, संस्कारक्षम वयातच मारुतरावांचे हे लिखाण आल्यामुळे पोषक वातावरण निर्माण झाले असे वाटते. कारण त्यांच्या लिखाणातून निसर्ग किती मोठा आणि रंजक आहे, हे अनेकांना समजले. भटकंतीला बाहेर पडता, निसर्गात जाता तेव्हा स्थानिक लोकांकडे दुर्लक्ष न करण्याचा विचार त्यांनी सर्वसामान्यांना दिला. या पारंपरिक शहाणपणाकडे त्यांनी जाणीवपूर्वक लक्ष वेधले. त्यांचे हे योगदान अत्यंत महत्त्वाचे वाटते. व्यंकटेश माडगुळकर त्यांच्या लिखाणातून एखादा रामोशी उभा करतात तर गोनीदांना 'माचीवरला बुधा' साद घालतो. अगदी त्याच पद्धतीने मारुतीरावांवर स्थानिकांची भुरळ होती, असे वाटते. या क्षेत्रातील मारुतीरावांच्या योगदानाबद्दल बोलायचे तर असे म्हणता येईल की, त्यांनी लोकांना निसर्गाकडे जाण्याचा संदेश दिला. निसर्गाकडे बघण्याची वेगळी दृष्टी दिली. कारण तिथे गेल्यानंतरच आपल्याला अनेक प्रश्नांची उत्तरे सापडतात, असे त्यांचे म्हणणे होते. माणूस निसर्ग समृद्ध करत नाही तर निसर्ग माणसाला समृद्ध करतो. मारुतीरावांनी आपल्या लेखनातून, कामातून हाच विचार देण्याचा प्रयत्न केला.

### ...आणि प्रत्यक्ष भेट झाली : श्रीकांत इंगळहळीकर, वनस्पती अभ्यासक

चितमपल्ली यांची पुस्तके वाचल्यामुळे, त्यांच्या कामाविषयी जाणत असल्यामुळे थेट भेट झाली नसली तरी त्यांच्याबद्दल मोठी उत्सुकता होती. मात्र पुढे 'आसमंत' या माझ्या पुस्तकाच्या निमित्ताने प्रत्यक्ष भेटीचा योग आला. या पुस्तकात मी जंगलातील अनुभव मांडले होते. यावर मारुतीसरांनी प्रस्तावना लिहावी, आपले पुस्तक वाचावे असे वाटत होते. मी त्यांना पुस्तक पाठवले होते. त्यानुसार ते पुण्यात आले असता प्रत्यक्ष भेटलो आणि प्रस्तावना लिहिण्यासंदर्भात चर्चा झाली. भेटीनंतर मी त्यांना गाडीतून हर्णेला सोडले. कारण त्यावेळी सागरी जलचरांचा अभ्यास करण्यासाठी त्यांचा मुक्काम तिथे होता. ही व्यक्ती जंगल, प्राणी, पक्षीच नव्हे तर, समुद्रातील जीवसृष्टीचाही अभ्यास करते, हे तेव्हा मला समजले. जलचरांची नावे, वैशिष्ट्ये, जीवनपद्धती या सगळ्यांचा अभ्यास करण्यासाठी ते बरेच दिवस हर्णे या गावात राहिले होते. स्वाभाविकच प्रवासात याविषयी गप्पा झाल्याच, खेरीज हर्णेमध्येही मी त्यांच्याबरोबर दोन-तीन दिवस राहिलो. त्यामुळे त्यांचा जवळून परिचय झाला. यानिमित्ताने लक्षात आले की, आवडते काम करण्याची संधी प्रत्येकालाच मिळते असे नाही. पण हाती आलेल्या कामाची आवड उत्पन्न करत त्यात कसे रमता येते याचे दर्शन घडवणारी ही व्यक्ती आहे. त्यांनी कामामध्ये आनंद शोधला आणि कामानिमित्त झालेल्या जंगलातील नियुक्तीला वेगळा आयाम दिला. त्यांनी अनेक गोष्टींची माहिती घेतली आणि आवडलेल्या गोष्टी इतरांपर्यंत पोहोचवल्या. त्यांची ही शैली मला खूप भावते आणि त्याचा प्रभाव जाणवतो. आपल्यापैकी अनेकजण निसर्गात जातात. भवताल बघतात. पण बघताना काही आत्मसात करण्याची, नोंद घेण्याची आणि भावलेले दुसऱ्याशी शेअर करण्याची प्रत्येकाची धारणा असतेच असे नाही. मात्र सरांकडे हा विचार होता. म्हणूनच त्यांनी नोंदवून ठेवलेल्या छोट्या छोट्या गोष्टींमधूनही अनेकांना अभ्यासाचे अनेक विषय मिळाले. अनेकांचे कुतूहल जागृत झाले. निसर्गवाचनातून आपल्याला मिळालेला आनंद त्यांनी लेखन, भाषणे या माध्यमांमधून अनेकांपर्यंत पोहोचवला. अर्थातच यानिमित्ताने त्यांनी वन अधिकारी म्हणून मिळालेल्या संधीचे सोने केले. त्यांच्या लिखाणामुळे अनेकजण जंगलाकडे वळले. जंगल कसे वाचायचे हे आपल्याला समजले. आज जंगल सफारीचे नियोजन करता येते. मात्र पायी जंगल फिरण्याच्या त्या काळात जंगलाचे नियम आत्मसात करण्याचे बाळकडू देणारा हा अरण्यऋषी आता आपल्यातून निघून गेला आहे. त्यांना विनम्र आदरांजली!

निसर्गसाधना करायला शिक, असे त्यांनी मला सांगितले होते. नागझिऱ्यामध्ये साडेचारशे दिवस राहिलो असता ते तेथे आले होते. तेव्हा झालेल्या मनमोकळ्या गप्पांमध्ये 'मला काहीही नको...' या विचारस्थितीपर्यंत पोहोचणे म्हणजे निसर्गसाधना... हे त्यांचे वाक्य कधीही विसरण्यासारखे नाही. खरे तर याचा अर्थ समजणे अवघड आहे. ते समजून देण्यासाठी मारुतीरावांसारखी ऋषीतुल्य व्यक्तीच लागते. आता त्यांनी आपला निरोप घेतला आहे. पण अशा विचारांच्या माध्यमातून त्यांचे स्मरण सतत राहील. भावपूर्ण श्रद्धांजली!



# चला जाऊ शाळेला!



**मृदुला घोडके**
**(माजी मराठी वृत्त विभाग प्रमुख आकाशवाणी, नवी दिल्ली)**

परवा माझ्या एका मैत्रिणीला फोन करत होते. २-४ वेळा बेल वाजली पण तिने उचलला नाही... काही मेसेजही नाही... म्हटलं कुठे बिझी झाली ही... रात्री मात्र तिचा फोन आला. दिवसभर शाळेत ॲडमिशनमध्ये व्यस्त होते असं सांगितलं. अरे खरंच की... शालेय किंवा महाविद्यालयीन पालकांच्या भूमिकेतून बाहेर पडून आता बरीच वर्षं झाली असल्याने या ॲडमिशनची धांदल माझ्या लक्षातच आली नाही. आपल्याकडे शाळेत ॲडमिशन म्हणजे एक सोहळाच असतो नाही? अलीकडच्या काळात तर त्याचं स्वरूप विलक्षण झालं आहे. मूल जन्माला यायच्या आधीपासूनच त्यांच्या दाखल्याची नोंदणी करण्यात येत आहे. आजच्या या स्पर्धेच्या युगात आपल्या मुलांच्या बाल लीलांचा आनंद घेत असतानाच त्या बाळाचं ॲडमिशन कुठल्या बालवाडीत, प्ले स्कूलमध्ये घ्यायचं... नंतर कुठल्या शाळेत घालायचं या तणावात मुलाचं संगोपन केलं जातं. आपल्या मुलांसाठी शैक्षणिक प्राधान्य आणि गरजा, भवितव्याचा विचार करून शाळांची निवड केली जाते. शाळेतला शैक्षणिक अभ्यासक्रम, जागा, तिथल्या सुविधा, फी, इतर वैशिष्ट्य इत्यादी संदर्भात मोठं संशोधन केलं जातं. बहुतेक शाळांमध्ये प्रवेशासाठी त्या इवल्या इवल्या मुलांच्या मुलाखती, चाचणी घेतली जाते. त्याचं टेन्शन आई-वडिलांना असतं. मुलांकडून सराव करून घेतला जातो. दिवसातून एकदा तरी अपेक्षित प्रश्नांची उत्तरं घोकून घेतली जातात. इच्छित शाळेत दाखला, त्यासाठी असलेली स्पर्धा, निवडीची प्रक्रिया आणि सामाजिक स्तर राखण्याचा दबाव... यामुळे शाळेत दाखला घेण्याची प्रक्रिया अत्यंत तणावपूर्ण आणि चिंताजनक ठरू शकते.

एवढा सगळा खटाटोप करून पाल्याला शाळेत ॲडमिशन मिळाल्यावर आणखी एक कसरत सुरू होते. २-३ वर्षांची ती इटुकली पोरं... शाळेत जायचं म्हणून आधी उत्सुक असतात पण तिथलं अनोळखी वातावरण, पालकांपासून काही काळ विलग होणे आणि नवीन अनुभव यामुळे ती गोंधळून जातात. अनेक भावनांचा कल्लोळ त्यांच्या मनात निर्माण होतो. बरीच मुलं शाळेतले कार्यक्रम, खेळ, खेळणी, गाणी, समवयस्क मुलं यांच्यामध्ये रमायला लागतात... पण अनेक बालकांना नव्या वातावरणाशी जुळवून घेता येत नाही. ती रडतात, गोंधळतात... शाळेविषयी त्यांच्या मनात एक भीती निर्माण होते. अशावेळी आपल्या मुलाला आपली गरज आहे हे पालकांनी ध्यानात घेतलं पाहिजे. आपल्या मुलाची मानसिकता जाणून घेऊन त्यांना सकारात्मक प्रेरणा, प्रोत्साहन दिलं पाहिजे.

शाळेत जाणं म्हणजे जागा बदल... तसंच घरातल्या ओळखीच्या व्यक्तींव्यतिरिक्त दुसऱ्या नव्या लोकांशी संबंध येणं. कोणत्याही बालकाच्या आयुष्यात हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. मुलांना कुठल्याही प्ले स्कूलमध्ये किंवा मोठ्या शाळेत दाखला घेण्याआधी आपल्या मुलाशी मोकळा संवाद साधावा. मुलाला तिथे कोण कोण भेटेल? तिथे वातावरण कसं असेल? तिथे कसे खेळ असतील? याची चर्चा करावी. अलीकडे बऱ्याच प्रि स्कूलमध्ये, शाळा सुरू होण्यापूर्वी ओरिएंटेशन सेशन आयोजित करतात. तिथे इतर पालक आणि मुलांबरोबर ओळख होऊ शकते. गप्पा मारता येतात. विश्वासाचं वातावरण तयार होऊ शकतं. मुलांची शाळा सुरू झाल्यानंतर त्यांना तिथे सोडताना धीर द्या, विश्वासात घ्या. शाळेविषयी चांगल्या गोष्टी गमतीजमती सांगा. त्यांना खोटी आश्वासने किंवा प्रलोभने दाखवू नका. इतर मुलांशी तुलना करू नका. अचानक तोडल्यासारखं करून सोडून जाऊ नका. निरोप घेताना मुलाला जवळ घेऊन, आपण शाळा सुटल्यावर त्यांच्यासाठी तिथे असणार आहात याची आठवण करून द्या.

एवढे प्रयत्न करूनही काही मुलांना शाळेत जाणं आवडत नाही. शाळा म्हटली की, ती बिथरतात. याची वेगवेगळी कारणं असू शकतात. शाळेत कोंदट खोल्या किंवा वर्ग असतील तर मुलांना तिथे रुळायला त्रास होतो. मोकळ्या हवेशीर वातावरणात मुले रमतात. प्रत्येक मुलाचं एक वेगळं भावविश्व असतं. काहींना खेळायला आवडतं तर काहींना चित्र रंगवण्यात किंवा चित्राची पुस्तकं पाहण्यात रस असतो. मुलाच्या कलेकलेने त्याला हाताळलं जात आहे की नाही याकडे लक्ष द्यावं. शाळेत काय प्रसंग घडतात यावरही मुलांची मनःस्थिती अवलंबून असते. एखाद्या वेळी त्यांना दुर्लक्षित वाटलं किंवा कुठे भांडण, मारामारी झाली तरी शाळेत जायला ती नको म्हणतात. त्याचा आत्मविश्वास कमी होऊ लागतो.

मुलांना शाळेची गोडी लावण्यात शिक्षकांचा मोठा वाटा आहे आणि जबाबदारीही आहे. शिक्षक आणि मुलांमध्ये छान, आनंददायी, विश्वासाचं भावनिक नातं निर्माण झालं की, मुलांना रविवारची सुट्टी सुद्धा नको वाटते.

शाळेचा पहिला दिवस मुलांसाठी आयुष्यभराची एक आठवण असते. त्याचं शिक्षण आणि विकासासाठी हे प्रारंभीचे दिवस खूप महत्त्वाचे आहेत. आपलं सकारात्मक मार्गदर्शन, आधार, प्रोत्साहन, समजूतदारपणा आणि प्रेम यामुळे आपलं मूल मोकळेपणानं आणि आश्वस्त होऊन हा नवीन अध्याय स्वीकारू शकेल.

# थोर विचारवंत पांडुरंगशास्त्री आठवले





**कोकण आयकॉन**
**सतीश पाटणकर**

योगेश्वर कृषी, वृक्षमंदिर, मत्स्यगंधा, घरमंदिर अशा एकापेक्षा एक विलक्षण सामाजिक उपक्रमांचे यशस्वी शिल्पकार, स्वाध्याय परिवाराचे प्रणेते, तत्त्वज्ञान विद्यापीठाचे संस्थापक, थोर विचारवंत, तत्त्वचिंतक पांडुरंगशास्त्री वैजनाथशास्त्री आठवले यांचा जन्म कोकणातील रायगड जिल्ह्यातील 'रोहा' येथे वेदशास्त्रसंपन्न घराण्यात झाला. त्यांचे वडील रोहे येथे सरस्वती संस्कृत पाठशाळा चालवीत होते. या पाठशाळेत पांडुरंगशास्त्री यांचे वडिलांपाशीच प्रारंभिक शिक्षण झाले. दादांच्या आईचे नाव पार्वती होते. आजी सरस्वतीबाईंचा छोट्या पांडुरंगवर विशेष जीव होता. आजीचे निधन झाल्यानंतर वैजनाथशास्त्री रोह्याहून मुंबईस स्थलांतरित झाले. त्यांनी मुंबईच्या गिरगाव भागात माधवबाग येथे पाठशाळा सुरू केली आणि याच पाठशाळेत दादांचा भारतीय दर्शनशास्त्रे, वेदान्तासह भारतीय व पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा अभ्यास झाला.

वयाच्या केवळ २२ वर्षी, १९४२ मध्ये त्यांनी वडिलांच्या आज्ञेने भगवद्गीतेवर पहिले प्रवचन दिले आणि त्यांच्या वाग्यज्ञाचा श्रीगणेशा झाला. दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक शांतता, सलोख्याच्या हेतूने १९५४ साली जपान येथे झालेल्या जागतिक तत्त्वचिंतक परिषदेसाठी पांडुरंगशास्त्री यांना विशेष निमंत्रित केले गेले. तेथे त्यांनी 'कृष्णम् वंदे जगद्गुरू' या विषयाद्वारे भारतीय अवतार कल्पनेवर आपले उदात्त, व्यापक विचार मांडून सर्वांना प्रभावित केले. त्यांची विद्वत्ता, मानव कल्याणाची उदात्त, व्यापक भूमिका आणि नवा दृष्टिकोन अमेरिकन तत्त्वचिंतकांना इतका भावला की, त्यांनी अमेरिकन नागरिकत्वाचा प्रस्ताव दादांपुढे ठेवला; पण दादांनी भारतभूमीत राहूनच कार्य करण्याचा आपला मनोदय ठामपणे व्यक्त केला.

१९५५ साली दादांनी 'स्वाध्याय परिवार' या कल्पनेला मूर्त रूप देण्याच्या दृष्टीने एकोणीस स्वाध्यायींना सौराष्ट्रात पाठविले आणि कार्यारंभ केला. 'भक्तिफेरी' असे या अभियानास नाव दिले गेले. आता या स्वाध्यायींची संख्या कित्येक लाख झालेली आहे. 'स्व'ला ओळखा, दुसऱ्यांच्या 'स्व'चा आदर करा, तेजाची पूजा करा, प्रेमभाव जपा, स्वतःला दुर्बल, शूद्र समजू नका, आपल्या हृदयस्थ देवत्वाला ओळखून आत्मगौरव संपादन करा,' असे सांगत स्वाध्याय परिवाराचे हे कार्य दादांनी मराठी एवढेच गुजराती बांधवांमध्ये, तेही आदिवासी, कोळी या समाजामध्ये मोठ्या आत्मीयतेने रुजविले. यातून 'योगेश्वर कृषी', 'मत्स्यगंधा' अशा उपक्रमांचा प्रारंभ झाला व ते अपेक्षेपेक्षा अधिक यशस्वी झाले. स्वाध्याय परिवाराचे कार्य पाहून खुद्द विनोबा भावे यांच्यासारखे भुदान चळवळीचे प्रणेतेही चकित झाले व त्यांनी स्वतःहून पांडुरंगशास्त्रींची भेट घेऊन स्वाध्याय परिवाराच्या कार्याचे सूत्र समजून घेतले. या दरम्यान पांडुरंगशास्त्रींनी ठाणे येथे तत्त्वज्ञान विद्यापीठाची स्थापना केली. या विद्यापीठाचे वेगळेपण लक्षात घेऊन भारताचे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी ठाण्याला भेट देऊन तत्त्वज्ञान विद्यापीठाची पाहणी केली व दादांचे विशेष कौतुक केले. दादांनी या विद्यापीठातील अभ्यासक्रमाच्या विदेशांतही शाखा उघडल्या. हिंदू धर्मासह ख्रिश्चन, इस्लाम, हिब्रू अशा विविध धर्मांचा निकोप दृष्टीने अभ्यास करून मग तुलनात्मकदृष्ट्या हिंदुधर्म विचार किती श्रेष्ठ, उदात्त, व्यापक आहे हे विदेशांतील विद्यार्थ्यांना स्वतःच्याच अभ्यासाद्वारे त्यांनी जाणवून दिले.

१९८६ साली दादांनी उत्तर प्रदेशातील गंगा-यमुनेच्या संगमस्थळी, प्रयाग येथे 'तीर्थ मिलन' महामेळावा घेतला. या मेळाव्यास तीन लाख स्वाध्यायी सहभागी झाले होते. या मेळाव्याच्या सर्व व्यवस्था स्वाध्यायींनी स्वतः श्रमदानाने निर्माण केल्या होत्या, तर २००१ साली दादांच्या सहस्रचंद्रदर्शनाच्या निमित्ताने गुजरातमध्ये पंधरा लाख स्वाध्यायींचा महामेळावा झाला होता.

दादांची ग्रंथसंपदाही भारतीय विचारांचे, चिंतनाचे उदात्त दर्शन आहे. 'संस्कृती पूजन', 'दशावतार', 'वाल्मिकी रामायण', 'श्रीकृष्ण जीवनदर्शन', 'श्राद्ध' (भाग १-२), 'ऋषिस्मरण' इत्यादी अनेक विचारगर्भ पुस्तके लिहून दादांनी भारतीय ऋषिचिंतनाचे तेज व ओज दाखवून दिलेले आहे. दादांची वाङ्मयसंपदा हे मराठीचे अक्षरवैभव आहे.

दादांनी भारत सोडून अन्यत्र अमेरिका, इंग्लंड या देशांत जाऊन स्थायिक होण्याचे नाकारले, यात त्यांची राष्ट्रनिष्ठा दिसते. तरीपण, त्यांनी अनेक देशांमध्ये स्वाध्याय परिवाराचे कार्य DAy-'डे' (Divine Association of Yogeshwar) अशी संस्था स्थापन करून विस्तारलेले आहे. अनेक देशांत त्यांच्या 'भक्तिफेरी'ने चांगलीच जागृती केलेली आहे. दादांचे कार्य पुरस्कारासाठी नाही, तरी त्यांच्या कार्याचा विविध संस्था, संघटनांनी राष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरव केलेला आहे. 'महात्मा गांधी सेवा' पुरस्कार, 'लोकमान्य टिळक' राष्ट्रीय पुरस्कार यांबरोबरच त्यांना 'रेमन मॅगसेसे' पुरस्कारही मिळालेला आहे. 'मनुष्य ही ईश्वराची सर्वोत्कृष्ट निर्मिती आहे, तिचा गौरव करा' या दादांच्या बोधामुळेच त्यांचा जन्मदिवस 'मनुष्य गौरव दिन' म्हणून स्वाध्यायी देशभर, विदेशांत साजरा करतात. २००३ मध्ये दिवाळीच्या प्रकाशोत्सवात लक्ष्मीपूजनाच्या दिनी दादांनी आपली इहलोकीची यात्रा संपविली. स्वाध्याय परिवाराचे कार्य वर्धिष्णू होत आहे.

**(लेखक मुख्यमंत्र्यांचे माजी माहिती अधिकारी आहेत.)**

# आषाढ : मनोकामना पूर्ण करणारा महिना





**विशेष**
**मृणालिनी कुलकर्णी**

जेव्हा जुलैमध्ये सूर्य कर्क राशीत प्रवेश करतो तेव्हा हिंदू पंचागानुसार आषाढ हा वर्षातील चौथा महिना सुरू होतो. आषाढ महिन्याच्या पौर्णिमेच्या आसपास चंद्र पूर्वाषाढा किंवा उत्तराषाढा नक्षत्राच्या जवळ असतो म्हणून या महिन्याला आषाढ किंवा आखाड असे म्हणतात.

आषाढात मान्सून पावसाला सुरुवात होते. असे बोलतात, 'आषाढात पावसाला अडथळा नाही म्हणजे एकदा पाऊस सुरू झाला की, तो रोखता येत नाही.' ग्रीष्म ऋतूमुळे हवेत खूप उष्मा असतो, वातावरण तापलेले असते. आषाढात पावसाच्या आधी आकाश काळ्या ढगांनी झाकोळले जाते. या दाटलेल्या घनगर्द काळ्या मेघालाच 'आषाढ घन' म्हणतात. अशावेळी वातावरण कुंद होते. अचानक सुटणाऱ्या जोरदार वाऱ्याने मेघ फुटतो आणि आषाढ सरी बरसू लागतात. हा तापलेला निसर्ग आषाढ सरीने शांत होतो. वातावरण थंड होते. शेतीसाठी आवश्यक तेवढा ओलावा जमिनीत राहिल्याने शेतातल्या पेरणीसाठी आषाढ पाऊस चांगली परिस्थिती निर्माण करतो. शेतकरी खरीप पिकाची पेरणी करण्याच्या तयारीत असतात. आषाढात पेरलेल्या बियांचे भरणं पोषण आषाढातील सरीवर होते, म्हणून आषाढाला 'सृजनाचा महिना' म्हणतात. निसर्गातील विविध सृजनाचा आविष्कार पाहण्यासाठी कवी बा. भ. बोरकर मेघाला म्हणतात, थोडावेळ थांब, 'मला हिरवीगार शेते, पोवळ्याच्या लाल रंगाच्या मातीत चालणारे नांगर, पाचूची बेटे... निसर्गातील ताजेपण, हे सारे मला पाहू दे. आषाढात प्रत्येक घरांत तळण तळले जाते. "आषाढात पेरावं आणि भाद्रपदात काढावं'. शेतकरी जीवनातील पेरणी-कापणीचे चक्र सूचित करणारी ही म्हण.

आषाढ महिन्याच्या पहिल्याच दिवशी आकाशात हत्तीच्या आकाराचा काळ्या रंगाचा पाण्याने भरलेला पावसाळी मेघ पाहून, चौथ्या शतकांत कवी कालिदासाने "मेघदूत" हे सुंदर खंडकाव्य मंदाक्रांता वृत्तात (मंद + अक्रांता) लिहिले आणि ते जगात अजरामर झाले. त्याची सुरुवात "आषाढस्य प्रथम दिवसे... " या शब्दांनी होते. त्यामुळे महाकवी कालिदासाचा जन्म आषाढ शुद्ध प्रतिपदेला झाला, असे मानले जाते आणि तो दिवस 'कालिदास दिन'म्हणून साजरा केला जातो. रामटेक येथील स्मृतिस्थळाला लोक भेट देतात. कवी कालिदास हे प्राचीन भारतातील एक महान संस्कृत कवी आणि नाटकार होते, म्हणून त्यांना कविकुलगुरू असे ओळखले जाते.

आषाढ महिन्याला कृषी, साहित्याबरोबरच, धार्मिक, सांस्कृतिक, दृष्ट्याही फार मोठे महत्त्व आहे. आषाढाचे धार्मिक महत्त्व म्हणजे हा भगवान विष्णूचा महिना! या महिन्यात भक्त भगवान विष्णूची उपासना, नामस्मरण, 'ओम नमो भगवते वासुदेवाय!' हा मंत्रही जपतात. आषाढी एकादशी (देवशयनी एकादशी)पासून भगवान विष्णू चार महिन्यांसाठी योग निद्रेला पातळात जातात. म्हणून या काळात मंगलकार्ये केली जात नाहीत. दुसरीकडे आषाढ महिन्यातील सांस्कृतिक परंपरा लाभलेली आषाढी एकादशी! ज्ञानदेव तुकारामाच्या जयघोषात, अभंग गात अनेक ठिकाणाहून तीन आठवडे पायी चालणारे वारकरी, वारकरी संप्रदायासह इतरही अनेक विठ्ठलमाऊलीच्या दर्शनासाठी वेडे झालेले भाविक आषाढी एकादशीला पंढरपूरला येतात. अध्यात्मिक आणि धार्मिक दृष्टिकोनातून आषाढातील आषाढी एकादशीला खूप महत्त्व आहे.

आषाढातील आषाढ पौर्णिमा हा दिवस भारतीय परंपरेतील एक विशेष महत्त्वाचा दिवस आहे. महाभारतकार आणि वेदाचे निर्माते महर्षी व्यास यांचा जन्मदिवस म्हणून 'व्यास पौर्णिमा'! महर्षी व्यासाच्या शिष्यांनी हा दिवस गुरुपौर्णिमा म्हणून साजरा करण्याची परंपरा सुरू केली. ज्ञानाच्या सर्व क्षेत्रांत महर्षी व्यास पारंगत होते. म्हणूनच व्यास गुरूंना 'आद्य गुरू' असेही म्हटले जाते. भगवान बुद्धाने आषाढ पौर्णिमेला पहिले प्रवचन दिले असे म्हणतात. तेच 'धर्मचक्र प्रवर्तन' होय. म्हणून बौद्धधर्मीयही आषाढी पौर्णिमेला भगवान बुद्धांना नमन करतात.

आषाढ महिन्याच्या शेवटच्या दिवशी जी तिथी येते तिला आषाढ अमावास्या किंवा दिव्याची अमावास्या (आवस) असे म्हटले जाते. जरी अमावास्या असली तरी त्या दिवसाचे पावित्र्य जपले जाते. घरातील सारे तेल-तुपाचे दिवे लावले जातात. त्या दिवशी दिव्याची पूजा करून घरात सर्वांना ओवाळले जाते. या दिवशी सुख-समृद्धीसाठी आणि उत्तम आरोग्यासाठी दिव्याजवळ प्रार्थना करतात आणि पुढे येणाऱ्या सणाचे स्वागत करतो. अशा या आषाढ महिन्यांत पावसामुळे शेतकरी, विठुरायाच्या दर्शनाने भक्त वारकरी सुखावतात. महाकवी कालिदास आणि महर्षी व्यासमुनींचा (साहित्य आणि ज्ञान) जन्मदिवस! असा हा सर्वांच्या मनोकामना पूर्ण करणारा सृजनशील आषाढ महिना!

mbk1801@gmail.com



# योगा हा व्यायाम नसून जीवनशैली

## डॉ.सुनिल जोंधळे: तुलसी इंग्लिश स्कूलमध्ये योगादिन उत्साहात

**सुनिल डोंगरे/बीड**

बीड:योगा हा केवळ शरीराला बळकट करणारा व्यायाम नव्हे, तर संपूर्ण जीवनशैली आहे. तो शरीर, मन आणि इंद्रिय यांच्यात समतोल साधतो. नियमित योगाभ्यासामुळे व्यक्ती केवळ शारीरिकदृष्ट्या नव्हे, तर मानसिक आणि बौद्धिकदृष्ट्याही सक्षम बनते, असे मत सुप्रसिद्ध योगतज्ज्ञ डॉ. सुनिल जोंधळे यांनी व्यक्त केले.

बीड येथील तुलसी इंग्लिश स्कूलमध्ये शनिवार, (२१) जून रोजी जागतिक योगादिन उत्साहात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तुलसी समूहाचे प्रमुख प्रा.प्रदीप रोडे होते, तर प्रमुख वक्ते म्हणून डॉ. सुनिल जोंधळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

जागतिक योगा दिनाच्या उपक्रमात डॉ. सुनिल जोंधळे यांनी विद्यार्थ्यांना विविध योगासनांचे प्रात्यक्षिक करून दाखवले आणि योग्य श्वसन तंत्र, ध्यान आणि प्रणायामाचे महत्त्व सांगितले. त्यांनी स्पष्ट केले की, आजच्या जीवनशैलीतून उद्भवणाऱ्या तणाव, थकवा, उच्च रक्तदाब, मधुमेह अशा समस्यांवर योगा हा प्रभावी उपाय आहे. योगामुळे व्यक्तिमत्व घडते, विचार सकारात्मक होतात आणि आरोग्य सुधारते. शाळेचे संचालक प्रा.प्रदिप रोडे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी योग अत्यंत उपयुक्त आहे. त्यामुळे शाळेच्या दिनक्रमात नियमित योगाभ्यासास प्राधान्य दिले जाईल. जागतिक योगा दिनाचा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापीका उमा जगतकर यांनी अतिशय योग्य नियोजन केले होते. दरम्यान सूत्रसंचालन ज्योत्सना राठोड यांनी केले.

### नॅकचा मिळाला दर्जा...

प्रा.प्रदिप रोडे यांच्या अथक संघर्षातून उभा राहिलेल्या चार महाविद्यालयांना नॅकचा बी दर्जा मिळाला आहे. त्यामध्ये तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन बीड, तुळसी कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी कॉलेज बीड, डॉ.एपीजे अब्दुल कलाम कॉलेज, नेकनूर, मॉडर्न कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी छत्रपती संभाजी नगर या महाविद्यालयांचा समावेश आहे.

ACCREDITED WITH GRADE B NAAC

### आत्मभान जागवणारे उपक्रम

विद्यार्थ्यांचे केवळ शैक्षणिक नाही तर सर्वांगीण घडणे ही काळाची गरज आहे. शाळा आणि महाविद्यालयांमधून केवळ पुस्तकापुरते शिक्षण न देता, नैतिक मूल्यं, सामाजिक बांधिलकी आणि आत्मभान जागवणारे उपक्रम राबविणारा शैक्षणिक समूह म्हणून प्रा.प्रदिप रोडे यांच्या शैक्षणिक समूहाने लौकिक मिळविलेला आहे.

# जायकोचीवाडी विकासापासून कोसोदूर

## आक्रमक: आझाद क्रांती सेनेचे रास्तारोको आंदोलन




पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगांव:खामगांव पंढरपूर महामार्गाजवळ जायकोचीवाडी फाटा येथे आज दि.२१ जून २५ रोजी सकाळी १० वाजता आझाद क्रांती सेनेच्या वतिने न्याय मागण्या साठी भव्य रस्तारोको करण्यात आला. आम्हाला प्यायला स्वच्छ पाणी का नाही ? आमच्या गावच्या शाळेला दर्जेदार शिक्षण का नाही ? शेतकऱ्यांना कर्जमाफी का नाही. गेली ३५ वर्षापासून जायकोचीवाडीचा रस्ता अद्यापपर्यत झालेला नाही शाळेतील विद्यार्थी, अबलावृद्ध, गर्भवती महिला, यांच्यासह गावकऱ्यांना दळणवळणा साठी रस्ता नसल्यामूळे नागरिकांमध्ये चिड निर्मान झाली असून रस्त्यासाठी संघर्ष करावा लागत आहे रस्त्याचे काम तात्काळ सुरू न केल्यास यापेक्षाही तीव्र आंदोलन आझाद क्रांती सेनेच्या वतीने करण्यात येईल असा इशारा याप्रसंगी देण्यात आला या आंदोलनामध्ये आझाद क्रांती सेना प्रमूख राजेशजी घोडे,ता.प्रमूख अशोक ढगे,किसन भिसे, उद्धव वाकणकर,अकाश हतागळे,राहूल गायकवाड,संजय हिवाळे,अरूण पिसूळे,भारत गायकवाड, गणेश कांबळे, पांडुरंग कांबळे, अशोक गायकवाड ( मन्या), सुनील कांबळे, सुनील खंडागळे, सुरेश घोडे, बप्पा सुरवसे, दादाराव थोरात, व समस्त गावकरी महिला यांची लक्षणीय उपस्थीती होते.

### योगादिन...



**मोठेवाडी:** माजलगाव तालुक्यातील मोठेवाडी येथील महात्मा फुले विद्यालयात योगादिन साजरा करण्यात आला, यावेळी मुख्याध्यापक घोडके,शिक्षक आणि विद्यार्थी आदी.

# हनुमान व्यायाम शाळेत योगा

## धोरण:नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:आंतरराष्ट्रीय योग दिन हा योगास मान्यता देणारा दिवस आहे. २०१४ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने स्वीकारल्यानंतर दरवर्षी २१ जून रोजी जगभरात साजरा केला जातो.येथील हनुमान व्यायाम शाळेत जागतिक योगा दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

शारीरिक आणि मानसिक आरोग्याला प्रोत्साहन देण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. या दिवसाच्या माध्यमातून योगाचे फायदे सांगितले जातात. योग दिनाची सुरुवात आंतरिक शांती आणि संतुलनाला प्रोत्साहन देण्यासाठी करण्यात आली. समाजात एकता आणि सौहार्द वाढविण्यासाठी जागतिक स्तरावर योग दिन साजरा करण्यात येतो. येथील हनुमान व्यायाम शाळेत शनिवारी (दि.२१) सकाळी ६ वाजता योगा डे साजरा करण्यात आला. यावेळी योग प्रशिक्षक सुदर्शन लिखे यांनी विद्यार्थी **पान दोन...**

# दात शरीर आरोग्याचे प्रवेशद्वार

## गोपाळ तिवारी: वारकरी सेवेसाठी पुढाकार

पुण्यभूमी प्रतिनिधी,



पुणे : श्री संत ज्ञानेश्वर महाराज व जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराजफ पालख्यांचे आगमन प्रसंगी, वारकरी सेवेसाठी अनेक मंडळे, संस्था, राजकीय पक्ष इ बरोबरच, ङ्गवैद्यकीय व्यावसायिक म पुढे येणे हे पुणे शहराच्या संस्कृतीचे प्रतिक असून, जे एम रोड वरील ङ्ग३२ स्माईल्स दंत चिकित्सा क्लीनिकफ चा आदर्श घेण्याजोगा असल्याचे, प्रतिपादन दंत चिकित्सा व कर्क रोग तपासणी प्रसंगी राजीव गांधी स्मारक समिति अध्यक्ष, काँग्रेस नेते गोपाळदादा तिवारी यांनी केले.या प्रसंगी ३२ स्माईल्स चे संचालक डॉ. मिलिंद दर्डा, लॉयर्स सोसायटीचे संचालक ॲड. फैयाज शेख, सहयोगी डॉ. प्रियांका राठी, डॉ. नँन्सी महाजन, डॉ. निलू व्यास, डॉ. भाव्या जैन, डॉ . घोष, ईशा राधा इ उपस्थित होते. सुमारे ५०० जणांनी चिकित्सा व औषधि इ चा लाभ घेतला..!गोपाळदादा तिवारी पुढे म्हणाले की, ङ्गशरीराच्या आरोग्यात दातांचे आरोग्य हे महत्वाचेफ असुन, **पान दोन...**

# सिरसाळा येथे अवैध वाळूवर कारवाई

पुण्यभूमी प्रतिनिधी

सिरसाळा:सिरसाळा पोलीसांनी सर्वच अवैध धंद्यावर कार्यवाहीचा धडाका सुरु केला आहे . तेलसमुख गोदावरी नदी पात्रात अवैध रित्या वाळू उपसा करुन टेम्पो द्वारे घेऊन जात असतांना सह पोलीस निरीक्षक गोरखनाथ दहिफळे व त्यांच्या टिमने कार्यवाही केली आहे. ताहेर रशिद सय्यद रा. लिंबा ता. पाथरी असे वाळू वाहतूक करणा–या आरोपीचे नाव आहे. यावर फिर्यादी पोलिस कर्मचारी विश्वजित विश्वांभर देवकते यांनी गुन्हा दाखल केला आहे. दिनांक १८ जून रोजी सायंकाळी ४ वा मौजे तेलसमुख ता. परळी येथील गोदावरी नदी पात्रात हि कार्यवाही करण्यात आली आहे . न्यु हॉलंड कंपनीचा पासिंग क्रमांक नसलेला ज्याचा चेसीस क्रमांक ७४४६८४, इंजिन क्रमांक ए३२३४१ असा असलेला हेड किंमत अंदाजे ४ लक्ष व सोबत विना पासिंगची दोन चाकी डंपिग ट्रॉली अंदाजे **पान दोन...**

# योगदिंडी आपल्या दारी अभियान मोहीम

## उपक्रम:बीडमध्ये जागतिक योगदिन




पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:जागतिक योग दिनानिमित्त बीड शहरातील सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयात ङ्गयोग दिंडी आपल्या दारीफ या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. काकू–नाना प्रतिष्ठान, पतंजली योग समिती (बीड), सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय व रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाउन यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम पार पडला. संपूर्ण वर्षभर राबवण्यात आलेले ङ्गयोग दिंडी आपल्या दारीफ अभियान पुन्हा सुरू ठेवण्यात येणार आहे. जागतिक योग दिनाचे औचित्य साधून पुढील वर्षभरासाठी या अभियानाची नवीन सुरुवातही करण्यात आली. उपस्थितांनी योग साधना करत जागतिक योग दिनाचे महत्त्व अधोरेखित केले, नागरिकांना नियमित योगाभ्यासासाठी प्रेरित केले. याप्रसंगी काकू–नाना प्रतिष्ठानचे अध्यक्ष ड.कालिदास ठिगळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महेंद्र गौशाल, ड.श्रीराम लाखे, नितीन गोपान, हरीश मोटवाणी, डॉ.निलेश जगदाळे, प्रा.राजेंद्र गाडेकर, रत्नाकर कुलकर्णी, विलास घोडके, विकास गवते, बाबासाहेब कुडके, पुरुषोत्तम एडके, हेमाताई विभुते, अनिता वजुरकर यांच्यासह योग शिक्षक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महिलांना तीन वर्षांपासून योगाचे धडे

## गीता पवार: गेवराईत जागतिक योगदिन

पुण्यभूमी प्रतिनिधी



गेवराई:धावपळीच्या जीवनात अनेक प्रश्न निर्माण होतात. त्या प्रश्नांना सामोरे जाण्यासाठी शारिरीक, मानसिकदृष्ट्या सुदृढ असणे आवश्यक आहे. योगाच्या बळावर महिलांचे आरोग्य संतुलित राहते. म्हणून, योग महिलांसाठी काळाची गरज असल्याचे प्रतिपादन जिजामाता योगा ग्रुपच्या संचालिका सौ. गिता भाभी पवार यांनी बोलताना केले. शनिवार ता. २१ रोजी सकाळी पाच ते सात , या वेळेत आयोजित करण्यात आलेल्या जागतिक योगा दिनाच्या निमित्ताने त्या बोलत होत्या.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, २१ जून जागतिक योग दिन म्हणून जगभरात साजरा करण्यात येतो. त्या पार्श्वभूमीवर, जिजामाता योग ग्रुपच्या वतीने गेवराई येथील गजानन मंगल कार्यालयातील भव्य सभागृहात सकाळी पाच ते सात, या वेळेत योग दिन साजरा करण्यात आला. या वेळी, बोलताना सौ. गिता भाभी पवार म्हणाल्या की, धावपळीचे आयुष्य झाले आहे. काळानुरूप बदल झाल्याने, माणसांचे आयुष्य घडाळाच्या काट्यावर पळते आहे. धावपळीत आरोग्याकडे दूर्लक्ष होते. त्याचे दुष्परिणाम होतात. महिलांचे आरोग्य खूप महत्त्वाचे असून, त्याकडे जाणीवपूर्वक लक्ष देण्याची गरज आहे. चांगल्या आरोग्यासाठी योगा महत्त्वाचा आहे. महिलांचे मानसिक, शारीरिक, भावनिक आरोग्य व्यवस्थित ठेवायचे असेल तर, महिलांनी आपल्या आरोग्यासाठी वेळ दिलाच पाहिजे. आरोग्याच्या बाबतीत तडजोड करू नका. त्यासाठी, नियमित व्यायाम, योगा आवश्यक आहे. जिजामाता योगा ग्रुपच्या माध्यमातून आम्ही सगळ्या महिला, तीन वर्षांपासून नियमित योगा करीत आहोत. आम्ही एकत्र आल्याने, विचाराची देवाणघेवाण झाली. बचत गटा सारखी आत्मनिर्भर चळवळ उभी करता आली. हे सामुहिक यश आहे. या व्यासपीठावर विविध सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घेता आला. महिलांची आरोग्य तपासणी, सहली, सांस्कृतिक कार्यक्रम घेऊन सामाजिक बांधिलकी जोपासून काम करण्याची **पान दोन...**

# पाली येथे योगदिन

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, पाली येथे २१ जून आंतरराष्ट्रीय योग दिन योगसाधक राज्य आदर्श शिक्षक पंढरीनाथ क्षीरसागर सर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी विविध योगासने व प्राणायाम करुन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये तळेकर सर, आघाव सर, राठोड सर, पायके सर, डोंगर सर, साळुंखे सर, काब्दे मॅडम, मुंडे मॅडम, म्हेत्रे मॅडम, हंगे मॅडम, सांगळे मॅडम, वाकचौरे मॅडम, खाडे मॅडम, मुळे मॅडम, जगताप मॅडम, सवई मॅडम व जाधव मॅडम यांनी विशेष उपस्थिती लावली. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी नियमित योगाभ्यासाचा संकल्प केला. यिोगाभ्यास करण्याचा संकल्प केला.

# राष्ट्रीय महामार्गाचे काम रखडले

## आक्रमक: श्रीकांत फडांचा आंदोलनाचा इशारा

पुण्यभूमी/प्रतिनिधी



परळी:शहरापासून जाणाऱ्या परळी – गंगाखेड रस्त्याचे काम बऱ्याच दिवसापासून रखडले असून, नागरिक, वाहनधारक, गावकऱ्यांची व परिसरातील जनतेची गैरसोय होत आहे. तसेच रूग्णांची ने–आण करण्यासाठी हेळसांड होत आहे व बऱ्याच जणांना वेळेवर वैद्यकीय उपचार न मिळाल्यामुळे प्राणास मुकावे लागले. मागील वर्षी पुलाचे काम अर्धवट असल्यामुळे सरस्वती नदीला आलेल्या पुरामुळे गतवर्षी २ ते ३ वेळा २ दिवस शहराचा संपर्क तुटला होता. त्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागला. सध्या पावसाळा दिवस सुरु असून त्याची पुर्नरावृत्ती होवू नये म्हणून सदरचे काम तात्काळ पुर्ण करण्यात यावे. काम सुरू न झाल्यास दि. ३० जुन, २०२५ रोजी सकाळी ०९.०० वाजता ईटके कॉर्नर येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात इशारा सरपंच श्रीकांत (कांताभाऊ) फड यांनी दिला आहे.

याबाबत मा.कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग, विभाग लातूर, उपविभागीय अभियंता, राष्ट्रीय महामार्ग, उपविभाग परळी वैजनाथ यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, परळी – गंगाखेड रस्त्याचे काम बऱ्याच दिवसापासून रखडले असून, नागरिक, वाहनधारक, गावकऱ्यांची व परिसरातील जनतेची गैरसोय होत आहे. परळी–गंगाखेड राष्ट्रीय महामार्गाचे रखडलेले काम आज तागायत पूर्ण झाले नसून याला जबाबदार राष्ट्रीय महामार्गाचे संबंधित गुत्तेदार आणि अधिकारी हे जबाबदार आहेत याचा फटका प्रवाशांना बसत आहे. वाहतूक कोंडी निर्माण होऊन या मार्गावर अनेक अपघाताच्या घटना घडल्या आहेत त्यामुळे या महामार्गाचे रखडलेले काम त्वरित पूर्ण करावे; रखडलेले पुलाचे काम करावे, ईटके कॉर्नर येथील रोचे काम करावे, शक्तीकुज वसाहत जवळकाम व गतीरोधक बसवावा अशी मागणी करण्यात आली आहे.

शहरापासून जवळच असलेल्या राष्ट्रीय महामार्ग परळी–गंगाखेड याचे काम संबंधित गुत्तेदाराकडून सुरू असून ते आज पर्यंत अपूर्ण आहे. संबंधित गुत्तेदार अतिशय निष्काळजी पणाने या मार्गाचे काम करत आहेत. औष्णिक विद्युत केंद्राचे जुने भांडार ते धर्मापुरी फाट्यापर्यंत पुलाचे आणि मार्गाचे काम अर्धवट रखडलेले आहे. त्यामुळे येथे वाहतूक कोंडी निर्माण होऊन **पान दोन...**

# झेडपी केंद्रीय शाळेत योगादिन

## उपक्रम:विद्यार्थ्यांनी नोंदविला प्रतिसाद

पुण्यभूमी प्रतिनिधी



पाटोदा:जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, पाटोदा येथे आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना योगाभ्यासाचे प्रत्यक्ष मार्गदर्शन देत योगाचे शारीरिक व मानसिक आरोग्यावर होणारे फायदे स्पष्ट करण्यात आले. कार्यक्रमात प्रमुख योग मार्गदर्शक म्हणून शितल पवनकुमार भोकरे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना विविध योगासने, प्राणायाम यांची माहिती देत त्याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. पवनकुमार भोकरे यांचीही या वेळी विशेष उपस्थिती लाभली.शाळेच्या वतीने श्रीमती शितल पवनकुमार भोकरे व पवनकुमार भोकरे यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमात गटशिक्षणाधिकारी कार्यालयाचे महाजन सर, मुख्याध्यापक बांगर, तसेच खेडकर, शिंदे मॅडम, राऊत, काकडे, गायकवाड मॅडम, गर्जे मॅडम, सारिका मॅडम आणि इतर शिक्षकवृंदांनी सक्रीय सहभाग नोंदवला.विद्यार्थ्यांनीही मोठ्या संख्येने सहभागी होत उत्स्फूर्तपणे योगाभ्यासात भाग घेतला.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता वाढून योगासने ही त्यांच्या दिनचर्येचा भाग ठरतील, असा विश्वास शिक्षकांनी व्यक्त केला.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले.